दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –५५ मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 55 Tuesday, Dt.03 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

तिकीट दरांमध्ये हस्तक्षेप करण्याचे सरकारला अधिकार

प्रवासी भाड्याबाबत नवे नियम जाहीर



नवी दिल्ली : क्रुड ऑइल आणि विमान इंधनाच्या वाढलेल्या किमतींमुळे विमान भाड्याची चिंता भेडसावत असतानाच केंद्र सरकारने नवीन विमान भाडे नियम जारी केले आहेत. या नवीन नियमांनुसार, आता सरकारला सार्वजनिक हितासाठी आणि काही विशिष्ट परिस्थितीत विमान तिकिटांच्या दरांमध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार मिळाले आहेत.

केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रालयाने 'भारतीय वायुयान नियम, २०२६' अंतर्गत ही अधिसूचना जारी केली आहे. या नवीन नियमांनुसार, परिस्थितीनुरूप सरकारने विमान कंपन्यांना भाड्याबाबत निर्देश दिल्यास, ते प्रमाणशीर असावेत आणि ठरवून दिलेल्या मुदतीपुरताच त्यांचा प्रभाव असावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नियमांची वैशिष्ट्ये: नियम १९२ नुसार, विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या ऑपरेशन्सचा खर्च आणि इतर बाबी लक्षात घेऊन तिकिटांचे दर ठरवावे लागतील. तसेच, या शुल्काची माहिती नागरी उड्डयन महासंचालनालयाला सादर करावी लागेल. तिकीट बुक करताना प्रवाशांना एकूण किती रक्कम भरावी लागणार आहे, याची स्पष्ट माहिती बुकिंग प्रक्रियेदरम्यान आणि तिकिटावर देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विमान कंपन्यांना बेस फेअर (मूळ भाडे), कर, शुल्क रद्द करण्याचे शुल्क, परतावा अटी आणि इतर लागू शुल्कांची वेगळी माहिती द्यावी लागेल. यामध्ये सरकारला द्यायचे कर आणि विमान कंपनीद्वारे आकारले जाणारे शुल्क वेगवेगळे दाखवावे लागतील.

कांदा, लिंबू आणि लसणाचे दर तेजीत



छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

बाजार समितीत कांदा, लिंबू आणि लसणाचे दर अद्यापही चढेच असल्याने स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले आहे. मात्र, भाजीपाल्याची आवक वाढल्याने शहरातील किरकोळ बाजारात अनेक भाज्यांच्या दरात घसरण झाली आहे. यात टोमॅटो, वांगी, कोबी, फ्लॉवर, भोपळा आणि काकडीच्या दरात किलोमागे १० ते २० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून महागाईचा सामना करणा-या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

जाधववाडी भाजीमंडईतील घाऊक बाजारात कांदा, लिंबू आणि लसणाचे दर अद्यापही तेजीत आहेत. त्यामुळे गृहिणींना स्वयंपाकघराचे बजेट सांभाळताना कसरत करावी लागत आहे. दरम्यान, घाऊक बाजारात भाजीपाल्याची आवक वाढली असून, त्याचा परिणाम किरकोळ बाजारात दिसून येत आहे.

औरंगपुरा, गुलमंडी, शहागंज, टीव्ही सेंटर आणि मुकुंदवाडी येथील बाजारांत टोमॅटोचे दर ५० रुपयांवरून ४० रुपये किलोवर आले आहेत. तसेच भोपळ्याचे दर ६० रुपयांवरून ४० रुपये, काकडीचे दर ६० रुपयांवरून ५० रुपये, तर वांग्याचे दर ८० रुपयांवरून ६० रुपये किलो झाले आहेत. कोबी आणि फ्लॉवरच्या दरातही प्रत्येकी २० रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे कोबी ४० रुपये, तर फ्लॉवर ६० रुपये किलोने विकले जात आहे.

आल्याचे दरही २४० रुपयांवरून २०० रुपये किलोवर आले आहेत. दुसरीकडे, बटाट्याचे दर ३० रुपये, तर कांद्याचे दर ६० रुपये किलो आहेत. भेंडी, गाजर, कारले, वाल, गिलके, हिरवी मिरची, सिमला मिरची आणि दोडके ८० रुपये किलोने विकले जात आहेत.

दिलपसंद १०० रुपये, शेवगा आणि श्रावण घेवडा १२० रुपये, तर कंटुले २०० रुपये किलोने विकले जात आहेत. लिंबाचे दर २०० रुपये किलो असून, लसणाला २०० ते ४०० रुपये किलो भाव मिळत आहे. पालेभाज्यांचे दर स्थिरपालेभाज्यांची आवक वाढल्याने त्यांच्या दरातही फारसा बदल झालेला नाही. मेथी, चुका, पालक, तांदुळजा आणि शेपू प्रत्येकी १५ रुपये जुडी, तर कोथिंबीर २० रुपये जुडीने उपलब्ध आहे.

एकूणच, बहुतांश भाज्यांचे दर स्थिर किंवा कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळत असला, तरी काही मोजक्या भाज्यांचे चढे दर कायम आहेत.

राजस्थानात विजेचा भीषण धक्का; ८ मजुरांचा मृत्यू, ५ जण जखमी

रस्ते बांधकामादरम्यान हायटेंशन वीजवाहिनीचा यंत्राला स्पर्श

झुंझुनू (राजस्थान) : राजस्थानातील झुंझुनू जिल्ह्यातील उदयपूरवाटी परिसरातील छपोली गावात सोमवारी रस्ते बांधकामादरम्यान भीषण दुर्घटना घडली. हायटेंशन वीजवाहिनीच्या संपर्कात बांधकामाचे यंत्र आल्याने विजेचा जोरदार धक्का बसून आठ मजुरांचा मृत्यू झाला, तर अन्य पाच मजूर भाजल्याने जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छपोली गावात रस्त्याचे बांधकाम सुरू होते. यावेळी खडी आणि वाळूचे मिश्रण तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे काँक्रीट मिक्सर यंत्र सुरू होते. या यंत्राचा हायड्रॉलिक जॅक वरून जाणाऱ्या उच्च दाबाच्या वीजवाहिनीच्या संपर्कात आला. त्यामुळे यंत्रामध्ये विद्युत प्रवाह उतरला आणि जवळ काम करणाऱ्या मजुरांना विजेचा तीव्र धक्का बसला.

या दुर्घटनेत आठ मजुरांचा जागीच किंवा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती देण्यात



आली असून, पाच जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली.

उदयपूरवाटीचे पोलीस ठाण्याचे प्रभारी रामपाल यानी या दुर्घटनेची माहिती दिली. बांधकामाच्या ठिकाणी हायटेंशन वीजवाहिनी आणि यंत्र यांच्यात संपर्क आल्याने ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक माहितीतून स्पष्ट झाले आहे.दरम्यान, या घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी आंदोलन सुरू केले आहे. दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच मृतांच्या कुटुंबीयांना योग्य मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जाण्याची शक्यता आहे.

या ८ जणांना आपला जीव गमवावा लागला

हलेदा मंडवारा येथील हरिराम गुर्जर (३०), शंकर लाल यांचा मुलगा; गिरधारीलाल गुर्जर यांचा मुलगा मंगलचंद (२२); काळूराम गुर्जर (२९), भिखाराम गुर्जर यांचा मुलगा; आणि जगदीश गुर्जर यांचा मुलगा पवन गुर्जर (२३) छपोली येथील विष्णू सैनी (३८), नानुराम सैनी यांचा मुलगा; महावीर सैनी यांचा मुलगा सुरेंद्र उर्फ सुरेश सैनी (३०) मुकेश सैनी (२७), शंकरलाल सैनी यांचा मुलगा; आणि फतेहचंद सैनी (३२), जगदीश यांचा मुलगा.

ना. पंकजाताई मुंडेंच्या पत्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे पंधरा मिनिटांतच उत्तर !

बीडच्या मंझरी हवेली फाटा महामार्गावर उड्डाण पुलाच्या सर्वेक्षणाचे दिले आदेश

नवी दिल्ली – बीड जिल्ह्यातील रेल्वे, रस्ते आणि महामार्गाच्या प्रश्नांवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. बीड जिल्ह्यातील मंझरी हवेली फाटा येथे महामार्गावर वारंवार होणारे अपघात लक्षात घेऊन याठिकाणी उड्डाणपूल मंजूर करावा अशी मागणी त्यांनी केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून केवळ पंधरा मिनिटांतच त्यांच्या पत्राला उत्तर मिळाले आणि उड्डाणपुलाच्या सर्वेक्षणाचे आदेश निघाले.

ना. पंकजाताई मुंडे आज नवी दिल्लीत होत्या. सकाळी त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. बीडचे गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेंद्र गुजर यांनी केलेल्या विनंतीवरून बीड – सोलापुर महामार्ग क्र ५२ वरील मंझरी



हवेली फाटा हा रस्ता मोठ्या वर्दळीचा असल्याने याठिकाणी वारंवार अपघात होतात, हे टाळण्यासाठी या रस्त्यावर उड्डाणपूल मंजुर करावा अशी मागणी ना. पंकजाताई मुंडेंनी गडकरी यांच्याकडे केली. या मागणीची गडकरी यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागाला निर्देश दिले आणि केवळ पंधरा मिनिटांतच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने मंझरी हवेली फाटा येथे उड्डाणपूलाच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले आणि सन २०२६-२७ च्या प्रकल्प आराखड्यात याचा समावेश करत असल्याचे कळवले.

केंद्रीय रेल्वमंत्र्यांची भेट

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट घेतली. या भेटीत बीड जिल्ह्यातील बीड-परळी रेल्वेमार्ग व जिल्ह्यातील रेल्वेच्या इतर समस्यांबाबत सविस्तर निवेदन देवुन चर्चा केली. मुंबई- लातुर, मछलीपट्टणम-बिदर, हैदराबाद-बिदर ह्या रेल्वेसेवा परळी वैजनाथ पर्यंत विस्तारीत कराव्यात तसेच परळी-बीड रेल्वेचे काम जलदगतीने पूर्ण करावे अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली. या मागणीलाही रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत लवकरच कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

जिल्हा न्यायालय बॉम्बने उडवण्याची धमकी!

ई-मेलमुळे खळबळ; न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांची धावपळ

बीड (प्रतिनिधी) : बीड जिल्हा न्यायालयात दुपारी ३ वाजून ११ मिनिटांनी बॉम्बस्फोट होणार असल्याचा धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याने न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास संपूर्ण न्यायालयाची इमारत रिकामी केली. न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच वादी-प्रतिवादी आणि इतर नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा न्यायालयाला धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. न्यायालयात बॉम्ब ठेवल्याचा तसेच दुपारी ३ वाजून ११ मिनिटांनी स्फोट होणार असल्याचा उल्लेख या ई-मेलमध्ये करण्यात आला होता. या संदेशाची माहिती मिळताच न्यायालय प्रशासनाने पोलिसांना कळवले.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस



उपअधीक्षक नवले आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी घटनास्थळी धाव घेतली. खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. त्यानंतर बॉम्बशोधक पथक, श्वानपथक आणि संबंधित यंत्रणांनी तपास सुरू केला.या कारवाईमुळे न्यायालयाचे कामकाज पूर्णतः ठप्प झाले. तपास पूर्ण होईपर्यंत न्यायालयातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना इमारतीबाहेर थांबावे लागले.दरम्यान, हा धमकीचा ई-मेल कोणी पाठवला, त्यामागील उद्देश काय आणि न्यायालय परिसरात प्रत्यक्षात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळते का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

पाच राज्यांत एसआयआरनंतर २.२९ कोटी मतदारांची घट

उत्तर प्रदेशात सर्वाधिक २ कोटी नावे वगळली

नवी दिल्ली : आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा, पंजाब आणि मणिपूर या पाच राज्यांमध्ये मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणानंतर (एसआयआर) मतदारांच्या संख्येत मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. संबंधित आकडेवारीनुसार, या पाच राज्यांमध्ये पुनरीक्षणापूर्वी सुमारे १८.७१ कोटी मतदार होते. अंतिम मतदार यादीतील संख्या घटून सुमारे १६.४३ कोटी झाली आहे. त्यामुळे सुमारे २.२९ कोटी मतदारांची नावे कमी झाली आहेत.

या पाच राज्यांमध्ये उत्तर प्रदेशात सर्वाधिक घट नोंदवण्यात आली आहे. येथे सुमारे २ कोटी ४ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. हा आकडा पाचही राज्यांतील एकूण घटेच्या जवळपास ९० टक्के असल्याचे दिलेल्या आकडेवारीतून दिसते. उत्तर प्रदेशात पुनरीक्षणापूर्वी १५ कोटी ४४ लाख मतदार होते. अंतिम यादीत ही संख्या घटून सुमारे १३ कोटी ४० लाखांवर आली आहे.

पंजाबमध्ये पुनरीक्षणापूर्वी सुमारे २ कोटी १५ लाख मतदार होते. मसुदा यादीत ही संख्या १ कोटी ९४ लाखांपर्यंत खाली आली होती. त्यानंतर अंतिम यादीत सुमारे ७ लाख मतदारांची भर पडल्याने एकूण संख्या २ कोटी १ लाखांवर पोहोचली आहे.उत्तराखंडमध्ये पुनरीक्षणापूर्वी ८० लाख मतदार होते. मसुदा यादीत ही संख्या ७१ लाखांवर आली होती. अंतिम यादीत काही वाढ होऊन मतदारांची संख्या सुमारे ७२ लाख झाली



आहे.मणिपूरमध्ये पुनरीक्षणापूर्वी सुमारे २० लाख ९० हजार मतदार होते. मसुदा यादीत ही संख्या १९ लाख ३० हजारांपर्यंत घटली होती. अंतिम यादीत ती किंचित वाढून १९ लाख ६० हजारांवर पोहोचली आहे.

गोव्यात पुनरीक्षणापूर्वी सुमारे ११ लाख ८५ हजार मतदार होते. मसुदा यादीत ही संख्या १० लाख ८५ हजारांवर आली. अंतिम यादीत आणखी घट होऊन मतदारांची संख्या सुमारे १० लाख ५८ हजार झाली आहे.पाच राज्यांतील या आकडेवारीमुळे मतदार यादी पुनरीक्षणाच्या प्रक्रियेची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, मतदारांची संख्या कमी होण्यामागील कारणे, वगळलेल्या नावांचे स्वरूप आणि पात्र मतदारांना आपले नाव पुन्हा समाविष्ट करून घेण्यासाठी उपलब्ध असलेली प्रक्रिया याबाबत अधिकृत तपशील तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026

संपादकीय....

आयोगाच्या शपथपत्राने आरोपाचा फुगा फुटला

तिन्ही निवडणूक आयुक्तांनी एकत्रितपणे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले आहे. ज्या बातमीच्या आधारे विद्यार्थी आंदोलकांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, ती बातमीच या शपथपत्रामुळे खोटी ठरली आहे. राहुल गांधी या शपथपत्रानंतर मूग गिळून गप्प बसले आहेत.

मतदार यादी सखोल पुनरीक्षण (एसआयआर) विरोधात दिल्लीत मोर्चे काढून स्वत:कडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणारे राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाने या मोहिमेविरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगितले. दस्तुरखुद्द सर्वोच्च न्यायालयाकडूनच असा आदेश आल्यावर राहुल गांधींचा नाइलाज झाला. या नाइलाजापोटी त्यांनी 'एसआयआर'विरोधात याचिका दाखल करणे भाग पडले. मोर्चापुढे, पत्रकार परिषदेत बोलताना निवडणूक आयोगाविरोधात राहुल गांधींनी वारेमाप आरोप केले. जाहीरसभेत बोलताना किंवा पत्रकार परिषदेत बोलताना केल्या जाणाऱ्या आरोपांसाठी पुरावे सादर करण्याची गरज नसते. याचाच फायदा घेऊन राहुल गांधी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात बेताल आरोपांच्या फैरी झाडत होते. आपण देशातील एकमेव आक्रमक नेते आहोत हे दाखवण्याच्या हट्टापायी राहुल गांधींनी घोडचूक करून ठेवली. ही घोडचूक होती सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्याची. संसदेवर किंवा अन्य सरकारी कार्यालयांवर राजकीय मोर्चे काढले जातात. न्यायालय हे मोर्चे, आंदोलने यासारख्या राजकीय हालचालींपासून दूरच असते. न्यायालयात याचिकांद्वारे आपल्या तक्रारी, कैफियत मांडली जाते. आपली तक्रार किती योग्य आहे, हे न्यायालयात कागदोपत्री वा अन्य पुराव्यानिशी सिद्ध करावे लागते. न्यायालय ही मोर्चा काढण्याची जागा नाही, एवढे प्राथमिक ज्ञान नगरसेवक, वॉर्ड स्तरीय कार्यकर्त्यालाही असते. चारवेळा खासदार म्हणून निवडून येऊनही राहुल गांधींना हे प्राथमिक ज्ञान नाही. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींच्या या आगळीकीची दखल घेत काँग्रेसच्या युवराजांना चांगलेच फटकारले. एका इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे राहुल गांधींनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर भारतीय जनता पक्षाला मदत केल्याचे बेफाम आरोप केले. निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' मोहिमेविरोधात यापूर्वीच याचिका दाखल झाली होती. या याचिकेत निवडणूक आयोगावर अनेक आरोप करण्यात आले होते.

जायकवाडी प्रकल्पाच्या कालव्यांतून ५ नोव्हेंबरपासून पहिले आवर्तन सुरू करणार

जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

छत्रपती संभाजीनगर (विमाका)

जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण डाव्या व उजव्या कालव्यांमधून रब्बी हंगामासाठी पहिले आवर्तन ५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जाहीर केला. कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविण्यास प्राधान्य देऊन 'टेल टू हेड' पद्धतीने पाणीवाटप करावे. तसेच जानेवारीमध्ये पाण्याच्या उपलब्धतेचा फेरआढावा घेऊन अतिरिक्त आवर्तनाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात जलसंपदामंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जायकवाडी प्रकल्प, पैठणच्या सन २०२६-२७ या वर्षातील कालवा सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीस खासदार संदिपान भुमरे, आमदार सर्वश्री प्रकाश सोळंके, राजेश टोपे, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, रत्नाकर गुट्टे, विठ्ठलराव लंघे पाटील, प्रतापसिंह पाटील, अंबादास दानवे, अमरसिंह पंडित, राहुल पाटील, नारायण कुचे, हिकमत उढाण, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेंद्र धोडपकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जलसंपदा विभागाने प्रकल्पातील पाण्याची उपलब्धता, सिंचन क्षेत्र आणि प्रस्तावित आवर्तनांचे सादरीकरण केले. आवर्तन म्हणजे कालव्यातून शेतीसाठी ठराविक कालावधीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याची पाळी होय. प्रारूप नियोजनानुसार पैठण डाव्या व उजव्या कालव्यासाठी रब्बी हंगामात प्रत्येकी तीन आणि उन्हाळी हंगामात प्रत्येकी एक, अशी चार आवर्तने प्रस्तावित होती. रब्बीसाठी १७.४८ टीएमसी व उन्हाळ्यासाठी ४.५९ टीएमसी असा एकूण २२.०७ टीएमसी संभाव्य पाणीवापर अपेक्षित आहे. रब्बी हंगामात सुमारे ५८ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ अपेक्षित असून, त्यात प्रामुख्याने चारा व भुसार पिकांचा समावेश आहे.

प्रारंभी पहिले आवर्तन १५ नोव्हेंबरपासून प्रस्तावित होते. मात्र दुष्काळी परिस्थिती, जमिनीतील ओलाव्याचा अभाव आणि पिकांची गरज लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनी पाणी लवकर सोडण्याची मागणी केली. त्यानुसार ५ नोव्हेंबरपासून पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी कालव्यांची आवश्यक साफसफाई व दुरुस्ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश जलसंपदामंत्र्यांनी दिले. दोन आवर्तनांमधील अंतर १५ दिवस किंवा गरजेनुसार तीन आठवड्यांपर्यंत ठेवून सुधारित नियोजन करण्याच्याही सूचना त्यांनी दिल्या.

सिंचनाचे नियोजन करताना केवळ प्रचलित लाभक्षेत्राची आकडेवारी न वापरता प्रत्यक्ष पेरणी झालेल्या क्षेत्राची माहिती विचारात घ्यावी. जलसंपदा व कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील आठ दिवसांत संयुक्तपणे पडताळणी करून मागील व चालू वर्षातील खरीप आणि रब्बी हंगामातील पीकक्षेत्राची तुलना करावी. त्यानुसार पाण्याची गरज निश्चित करण्याचे निर्देश डॉ. विखे पाटील यांनी दिले.

पिण्याच्या पाण्यासाठी ऑगस्ट २०२७ अखेरपर्यंत आवश्यक आरक्षण आणि १० टक्के राखीव साठा विचारात घेऊन सिंचनाचे नियोजन करण्यात येत आहे. दोन आवर्तनांनंतर जानेवारीमध्ये पाण्याचा प्रत्यक्ष वापर व शिल्लक साठ्याचा फेरआढावा घ्यावा. आवश्यकतेनुसार मार्चमध्येही उपलब्धतेचा विचार करून अतिरिक्त आवर्तनाबाबत निर्णय घेता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



परभणी आणि माजलगावसह कालव्याच्या शेवटच्या टोकावरील लाभक्षेत्रात पाणी पोहोचण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी मांडल्या. त्यावर डॉ. विखे पाटील यांनी 'टेल टू हेड' पद्धतीने पाणीवाटप करण्याचे निर्देश दिले. अनधिकृत पाणीउपसा, जोडण्या व मोटारींवर कारवाई करावी. आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण घेऊन शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचेल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

गोदावरीवरील सात बॅरेजेसमध्ये पाणी सोडण्याचे नियोजन गोदावरी नदीच्या खालच्या प्रवाहातील सात बॅरेजेसमध्ये पाणी उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. या बॅरेजेसमध्ये पाणी सोडल्यास नदीकाठच्या गावांना लाभ होणार असल्याचे लोकप्रतिनिधींनी सांगितले. त्यावर पहिल्या किंवा दुसऱ्या आवर्तनादरम्यान बॅरेजेसमधील पाणीसाठा वाढविण्याची शक्यता तपासून नियोजन करावे. उन्हाळ्यातील पाण्याची गरज आणि बाष्पीभवनामुळे होणारी घट विचारात घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश डॉ. विखे पाटील यांनी दिले.

शेतकऱ्यांच्या पिकांसाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देताना पिण्याच्या पाण्याचे आरक्षण, भविष्यातील गरज आणि धरणातील उपलब्ध साठा यांचा समतोल राखावा. पाण्याचा अपव्यय टाळून प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचविण्यास प्राधान्य द्यावे, असेही जलसंपदामंत्र्यांनी सांगितले.

दुष्काळाच्या संकटात आमदार सुरेश आण्णा धस यांच्यामुळे वयोवृद्ध शेतकऱ्याला हृदयशस्त्रक्रियेसाठी मोठा आधार!

हृदयातील रक्तवाहिनीवरील उपचार व स्टेंट शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत

पाटोदा – प्रतिनिधी

पाटोदा परिसरात सध्या गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत गांधनवाडी (ता. पाटोदा) येथील वयोवृद्ध शेतकरी सदाशिव किसन कदम यांना हृदयविकारावरील उपचारांसाठी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. कदम यांच्यावर हृदयातील रक्तवाहिनीवरील उपचार व स्टेंट शस्त्रक्रिया योजनेअंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली असून, जवळपास १ लाख ७४ हजार रुपयांचा उपचार खर्च मंजूर झाल्याने या शेतकरी कुटुंबावरील आर्थिक भार हलका झाला आहे. विशेष म्हणजे, रुग्णालयातील दहा दिवसांच्या उपचारांसह संपूर्ण प्रक्रिया मोफत पार पडल्याने कुटुंबाला एकही रुपया खर्च करावा लागला नाही.

सदाशिव कदम यांना छातीत त्रास जाणवू लागल्याने त्यांना अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. हृदयावरील शस्त्रक्रिया आणि त्यानंतरच्या उपचारांचा खर्च परवडणार कसा, असा प्रश्न दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या या शेतकरी कुटुंबासमोर उभा होता. दरम्यान, नगरसेवक श्रीहरी गीते पाटील यांना या प्रकरणाची माहिती मिळताच त्यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी संपर्क साधून परिस्थिती अवगत केली.

रुग्णाला वेळेत उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणींमुळे उपचार थांबू नयेत, या उद्देशाने आमदार धस यांनी तातडीने यंत्रणा कार्यान्वित केली. योजनेच्या माध्यमातून उपचारांचा खर्च मंजूर करून घेण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य विभागाचे पाटोदा येथील स्वीय सहाय्यक ड. महेश बेदरे आणि स्वीय सहाय्यक सोमनाथ कोल्हे यांना दिल्या.

साईदीप सह्याद्री हॉस्पिटलमधील संबंधित विभागाचे डॉ. आनंद कटारिया यांच्याशी संपर्क साधून योजनेच्या माध्यमातून उपचारांचा खर्च मंजूर होण्यासाठी पाठपुरावा केला डॉक्टर खर्चे यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करून जवळपास १ लाख ७४ हजार रुपयांच्या उपचार खर्चाला शंभर टक्के मंजुरी मिळविण्यात यश आले. त्यामुळे सदाशिव कदम यांची हृदयातील रक्तवाहिनीवरील उपचार व स्टेंट शस्त्रक्रियेसह रुग्णालयातील दहा दिवसांचा उपचार खर्च पूर्णपणे मोफत झाला.

उपचार पूर्ण झाल्यानंतर सदाशिव कदम यांना काल रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून, ते सुखरूप आहेत. एकीकडे गंभीर दुष्काळी परिस्थिती, तर दुसरीकडे हृदयावरील शस्त्रक्रियेचा मोठा खर्च अशा दुहेरी संकटात सापडलेल्या कदम कुटुंबाला या मदतीमुळे मोठा आधार मिळाला आहे. वेळेवर झालेला पाठपुरावा आणि योजनेच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे



कुटुंबावरील आर्थिक भार पूर्णपणे कमी झाला.

दुष्काळामुळे शेतकरी कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडलेले असताना गंभीर आजारावरील उपचारांचा खर्च पेलणे अनेकांसाठी कठीण ठरते. अशा वेळी शासकीय योजनांचा लाभ गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवून त्यांना वेळेत उपचार मिळवून देणे महत्त्वाचे ठरते. सदाशिव कदम यांना मिळालेली मदत याचेच उदाहरण आहे. उपचारांसाठी एकही रुपया खर्च करावा न लागल्याने कदम कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्यासह या प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले.

केज महावितरण विभागात विजबिलाचा मोठा घोटाळा

केज/प्रतिनिधी

केज महावितरण कार्यालयात विजबील भरण्यात मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी ज्योती चंद्रकांत पाटील ग्राहक क्रमांक ५८१६३०४५२२२१ या ग्राहक क्रमांकाचे विद्युत बील महावितरण विभागातील तंत्रज्ञ विष्णु तेलंग यांच्या मोबाईलवरून १५२० रुपये भरले असता ते जमाच झाले नाही. विज ग्राहक यांनी दि.२ नोव्हेंबर २०२६ रोजी महा वितरण कार्यालयात जाऊन विज बीलाची मागणी केली असता १५२० रुपयांचे बील देण्यात आले.दि.२६ ऑक्टोबर रोजी भरलेले बील जमा का झाले नाही हे गौडबंगालच आहे.या प्रकरणी उप अभियंता श्री.डी.एम.पवार यांच्याशी फोन वरुन संपर्क साधला असता त्यांचा फोन बंद असल्याने ग्राहकाने मोबाईल वरून विज बिल १५२३ रुपयांचा पुन्हा भरणा केला आहे.दरम्यान २६ ऑक्टोबर रोजी भरलेले बील गेले कुठे? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.दुष्काळाच्या परिस्थितीत ही जर विज ग्राहकांची लुट होत असेल तर न्याय कोणाकडे मागायचा? हा प्रश्न ग्राहकाला पडला आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून विज ग्राहकांना दिलासा द्यावा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक . ६६७ /२०२६
जाकीर वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय हिवरवाडी

ज्याअर्थी अर्जदार नामे **जाकीर उस्मान सय्यद, वय ४४ वर्षे, धंदा–शेती, रा. हिवरवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय हिवरवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांची मुलगी नामे **आलिशा जाकीर सय्यद , यांच्या** दि. १९/०१/२०१३ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०१/१२/२०२६

स्वाक्षरीत/– कनिष्ठ लिपीक **शिक्का** **आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई**

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक . /२०२६
मल्हारी वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय टकलेवाडी
(मार्फत आर ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **मल्हारी पि. वैजनाथ टकले, वय २४ वर्षे, धंदा–शेती, रा. टकलेवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय बंगालिपिंपळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांनी **लम्हारी पि.वैजनाथ टकले, यांच्या** दि. ०७/१२/२००२ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्यबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २४/१२/२०२६

स्वाक्षरीत/– कनिष्ठ लिपीक **शिक्का** **आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई**

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०४/२०२६
प्रदिप व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आर ए.कोळेकर, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **धोंडीराम पि.जिजा काशीद**, हे / हया दिनांक २९/०२/२००४ रोजी **मौजे कोळगांव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ प्रदिप पि. आसाराम काशीद, वय ३६ वर्षे, धंदा–शेती, रा. कोळगांव, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ ललीता भ्र. राजु बुलबुले, वय ५४ वर्षे, धंदा – शेती, रा. भनंद जळगांव, ता.अंबड, जि. जालना**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०२/१२/२०२६

स्वाक्षरीत /– कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई — **शिक्का** — स्वाक्षरीत/– सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५९/२०२६
कलावतीबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एस.एस.काळे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **नामदेवराव पि. संतराम निकम**, हे / हया दिनांक २१/०५/२०२४ रोजी **मौजे सरस्वती कॉलनी नं. ४, ताकडगाव रोड, गेवराई, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ कलावतीबाई भ्र. नामदेवराव निकम, वय ६५ वर्षे, धंदा–शेती, रा. सरस्वती कॉलनी नं. ४, ताकडगाव रोड, गेवराई, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ राधेशाम पि. नामदेवराव निकम, वय ४२ वर्षे, धंदा – नोकरी, रा. सदर, अर्जदार क्र. ३ सचिन पि. नामदेवराव निकम, वय ३७ वर्षे, धंदा नौकरी, रा. सदर.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०९/१२/२०२६

स्वाक्षरीत /– कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई — **शिक्का** — स्वाक्षरीत/– सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५९/२०२६
द्रोपदी व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आर.एल.गवारे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **बाबुराव पि.मारोती पवळ**, हे / हया दिनांक ०४/१२/२०२५ रोजी **मौजे सिरसमार्ग, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ द्रोपदी भ्र. बाबुराव पवळ, वय ७५ वर्षे, धंदा–शेती, रा. सिरसमार्ग, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ भिमा पि. बाबुराव पवळ, वय ३८ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर, अर्जदार क्र. ३ अर्जुन पि. बाबुराव पवळ, वय ३५६ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर, अर्जदार क्र. ४ आशा भ्र. सुनिल शेरेकर, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा.अमरावती, ता.जि.अमरावती.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०८/१२/२०२६

स्वाक्षरीत /– कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई — **शिक्का** — स्वाक्षरीत/– सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०५/२०२६
पुरषोत्तम व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. के.व्ही.लोंढे)

ज्याअर्थी मयत नामे **सागरबाई नारायण लोंढे**, हे / हया दिनांक ०४/१२/२०२० रोजी **कोळगांव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ पुरषोत्तम पि. नारायण लोंढे, वय ५० वर्षे, धंदा–शेती, रा. कोळगांव, अर्जदार क्र. २ गणेश पि. नारायण लोंढे, वय ४७ वर्षे, धंदा – शेती, रा. सदर.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०८/१२/२०२६

स्वाक्षरीत /– कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई — **शिक्का** — स्वाक्षरीत/– सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७९९/२०२६
जनाबाई वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय रोहितळ
(मार्फत एम.डी.सानप)

ज्याअर्थी अर्जदार नामे **जनाबाई दिनकर गायकवाड, वय ५४ वर्षे, धंदा–शेती व घरकाम, रा. रोहितळ, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय रोहितळ, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचे पती नामे **दिनकर पि. आत्माराम गायकवाड, यांच्या** दि. १४/०५/१९९३ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्यबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– ०९/१२/२०२६

स्वाक्षरीत/– कनिष्ठ लिपीक **शिक्का** **आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई**

श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८६२/२०२६

लक्ष्मण गंडे वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **लक्ष्मण पि. झुंगा गंडे, रा. चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक ग्रा. कार्यालय, चोरपुरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांचा मुलगा नामे अंबादास लक्ष्मण गंडे** यांच्या जन्म दि. १५/०६/२०१६ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः२८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८८९/२०२६

सविता वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय, तलवाडा

(मार्फत एस.पी.येवले)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सविता शाम ठाकरे, वय-३० वर्षे, धंदा-शेती, रा.मोरेवाडी, ता.अंबाजोगाई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक ग्रा. कार्यालय, तलवाडा, ता. गेवराई, जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची मुलगी नामे वैष्णवी पि. शाम ठाकरे यांच्या** दि. १७/११/२०१९ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९५६/२०२६

भाऊसाहेब वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय खोकी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **भाऊसाहेब लक्ष्मण चोरमले, रा. खोकी, ता. गेवराई, जि.बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय खोकी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचे वडिल नामे **लक्ष्मण सखाराम चोरमले, यांच्या** दि. ०१/०८/१९९७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २२/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७६१/२०२६

शिवाजी वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय तळणेवाडी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शिवाजी रामकिसन शिंगाडे, वय ४७, धंदा-शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई, जि.बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचे वडिल नामे **रामकिसन दादाराव शिंगाडे, यांच्या** दि. ३०/०५/२०२१ रोजीची मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९५५/२०२६

तुळसा गचांडे वि. ग्रामसेवक, ग्रा.कार्यालय माटेगाव

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **तुळसा भ्र. संतोष गचांडे, वय ३२ वर्षे, धंदा-शेती, रा. टाकळगव्हाण, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रा.कार्यालय, माटेगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांचे वडिल महादेव साहेबराव मस्के, रा.माटेगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांच्या जन्म दि. १३/१०/२००९ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः२८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २८/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४३८/२०२६

सखु भिसे वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, खेर्डावाडी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सखु भ्र. दत्ता भिसे, रा.खेर्डावाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, खेर्डावाडी** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांचे पती नामे दत्ता उत्तम भिसे यांची** दि. १०/१२/२०१७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०४/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७७८/२०२६

राजेश वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय खेर्डावाडी

(मार्फत आर ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **राजेश बाबासाहेब वाघमोडे, रा. खेर्डावाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय खेर्डावाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा मुलगा नामे **प्रेमराज राजेश वाघमोडे, यांच्या** दि. २५/०५/२०१० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६८८/२०२६

सखाराम वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय चोपड्याचीवाडी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सखाराम भगवान तुरे, रा.चोपड्याचीवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय चोपड्याचीवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा मुलगा नामे **नितीन सखाराम तुरे यांची** दि. २९/०८/२०१३ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०३/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९७०/२०२६

अशोक वि. ग्रामसेवक, ग्रा.कार्यालय ठा.आडगांव

(मार्फत व्ही.एस.शिंदे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **अशोक वैजनाथ जोगदंड, रा. ठा.आडगांव, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रा.कार्यालय, ठा.आडगांव, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची स्वतः नामे अशोक वैजनाथ जोगदंड** यांच्या जन्म दि. ०१/१२/१९९० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक :२८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २२/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७४८/२०२६

राजकन्या वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, धानोरा

(मार्फत व्ही.एस.शिंदे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **राजकन्या कचरु शिंदे, रा.धानोरा, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, धानोरा** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची स्वतः नामे राजकन्या कचरु शिंदे यांच्या** दि. १३/११/२०१० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .५०३/२०२६

भिमराव कांबळे वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय रांजणी

(मार्फत आर ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **भिमराव पि. संतराम कांबळे, वय ४२ वर्षे, धंदा-शेती, रा. रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचा मुलगा नामे **कार्तिक पि. भिमराव कांबळे, यांच्या** दि. २३/०५/२०११ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०३/११/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६८९/२०२६

नवनाथ वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय चोपड्याचीवाडी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नवनाथ मारुती तुरे, वय ४३ वर्षे, धंदा-शेती, रा.चोपड्याचीवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय चोपड्याचीवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचे वडील नामे **मारुती तुकाराम तुरे यांची** दि. ०१/०९/२०२२ रोजीची मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०२/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९२१/२०२६

आबासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.महांडुळा

(मार्फत व्ही.एस.शिंदे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **आबासाहेब चंद्रकांत माने, रा. महांडुळा, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय महांडुळा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वतः नामे आबासाहेब चंद्रकांत माने, यांच्या** दि.१२/०९/२०२२ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०५/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८४६/२०२६

नर्मदा पहाडे वि. ग्रामसेवक ग्रा.राक्षसभुवन

(मार्फत ए.बी.बांगर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **नर्मदा रामभाऊ पहाडे, रा. हिंगणी इंदेगाव, ता. पैठण, जि.छ.संभाजीनगर** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, राक्षसभुवन,** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांचे वडील नामे धनु पि. रामचंद्र काहार** यांच्या दि. १९/०९/१९८६ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांकः२८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०८/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .८६८/२०२६

स्वरांजली दराडे वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, तलवाडा

(मार्फत ए.बी.बांगर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **स्वरांजली पि. श्रीमंत दराडे, रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची स्वतः नामे स्वरांजली पि. श्रीमंत दराडे** यांच्या दि. २८/११/२००७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६९१/२०२६

उमा वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय खेर्डावाडी

ज्याअर्थी अर्जदार नामे **उमा सुदर्शन गायके, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. खेर्डावाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय खेर्डावाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांची मुलगी नामे **कार्तिकी सुदर्शन गायके यांची** दि. १८/०३/२०२३ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- ०२/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.एच. एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .५०४/२०२६

निलेश वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय रांजणी/शिंदेवाडी

(मार्फत आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **निलेश शिवाजी शेटे, रा. रांजणी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय रांजणी/शिंदेवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे कार्तिक पि. निलेश शेटे, यांच्या** दि.२६/०६/२०१० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे, व त्याबाबत गैरअर्जदार

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026

पान -४
PAGE - 4

ऊसतोड मजुरांच्या पाल्यांच्या हंगामी वसतिगृहांचा प्रश्न ऐरणीवर..!

१२१ वसतिगृहांतील १० हजार २५४ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला, आष्टी-पाटोदा तालुक्यांत एकही वसतिगृह प्रस्तावित नाही

बीड।प्रतिनिधी

ऊसतोड मजुरांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान आणि स्थलांतर रोखण्यासाठी दरवर्षी सुरू करण्यात येणाऱ्या हंगामी वसतिगृहांचा प्रश्न यंदाही ऐरणीवर आला आहे. १५ ऑक्टोबरपासून साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होऊन पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधी उलटला असतानाही जिल्ह्यातील प्रस्तावित हंगामी वसतिगृहे अद्याप सुरू झालेली नाहीत. जिल्ह्यातील १२१ प्रस्तावित वसतिगृहांमधील १० हजार २५४ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य त्यामुळे टांगणीला लागले आहे. विशेष म्हणजे ऊसतोड मजुरांचे सर्वाधिक स्थलांतर होणाऱ्या आष्टी आणि पाटोदा या संवेदनशील तालुक्यांत यंदा एकही हंगामी वसतिगृह प्रस्तावित नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे तसेच विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण

ऊसतोड मजुरांच्या स्थलांतरामुळे दरवर्षी हजारो मुलांचे शिक्षण अर्धवट राहते. मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाकडून हंगामी वसतिगृहांची संकल्पना राबविण्यात येते. मात्र, यंदा शिक्षण विभागाने महिनाभरापूर्वी प्रस्ताव मागवूनही प्रत्यक्ष वसतिगृहे सुरू करण्याबाबत विलंब होत असल्याचे चित्र आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातून १२१ वसतिगृहांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामध्ये १० हजार २५४ विद्यार्थ्यांची नोंद आहे. मात्र, सर्वाधिक ऊसतोड मजुरांचे स्थलांतर होणाऱ्या आष्टी व पाटोदा तालुक्यांचा या प्रस्तावित यादीत समावेश नसल्याने या भागातील ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

वसतिगृहांच्या कामकाजाबाबत तक्रारी होण्याचे प्रमाण जास्त असल्याने शिक्षण विभागावर प्रशासकीय ताण वाढतो. त्यामुळे वसतिगृहे सुरू करण्याबाबतच



अनास्था दाखवली जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासकीय त्रुटींचा फटका मात्र गरीब ऊसतोड कामगारांच्या चिमुकल्या मुलांना बसत असून त्यांचे शैक्षणिक वर्ष उद्ध्वस्त होण्याची भीती आहे.

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा

ऊसतोड मजुरांच्या मुलांचे शिक्षण हा केवळ प्रशासकीय विषय नसून त्यांच्या भवितव्याशी निगडित अत्यंत संवेदनशील प्रश्न आहे. त्यामुळे प्रस्तावित वसतिगृहांना तातडीने मंजुरी देऊन ती प्रत्यक्ष सुरू करावीत, आष्टी व पाटोदा तालुक्यांतील स्थलांतरित मजुरांच्या पाल्यांसाठी विशेष व्यवस्था करावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, शेख मुबीन, रामनाथ खोड , माजी सैनिक तथा आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, शेतकरी हक्क मोर्चा आंदोलक राजेंद्र आमटे,शहराध्यक्ष , इंटकचे बीड जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.डी.जी. तांदळे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच) , सरफराज पठाण , अँड.करूणा टाकसाळ, विजय झोडगे,आदी सहभागी झाले होते.

पीकविमा मंजूर करण्याची वेळ आली तेव्हा ५१ हजार अर्ज रिव्हर्ट

शेतकऱ्यांना वंचित ठेवण्याचा कंपनीचा डाव उघड - सर्व अर्ज पात्र करून पीकविमा मंजूर करा - जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

मुखेड ।प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत सर्वच शेतकऱ्यांचा पीकविमा मंजूर करा, अशी मागणी आज नांदेडचे जिल्हाधिकारी मा. राहुल कर्डीले साहेब यांची भेट घेऊन मा. जि.प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर व शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी निवेदन देऊन केली आहे.

आज पीकविमा मंजूर करायची वेळ आली आहे, तेव्हा पीकविमा कंपनी शेतकऱ्यांच्या पीकविम्याच्या अर्जात त्रुटी दाखवून जिल्ह्यात अंदाजे ५८ ते ५९ हजार पीकविमा अर्ज रिव्हर्ट केले आहेत. यात पीकविमा कंपनीचा शेतकऱ्यांना पीकविम्यापासून वंचित ठेवण्याचा हेतू उघडपणे दिसून येत आहे. याची चौकशी करून दुष्काळी परिस्थितीत होरपळत



असलेल्या सर्वच शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला पाहिजे. पीकविमा कंपनीने रिव्हर्ट केलेले सर्वच पीकविमा अर्ज हे पात्र करून त्यांना पीकविमा मंजूर करण्याचे आदेश पीकविमा कंपनीला द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

पीकविमा कंपनी शेतकऱ्यांचे अर्ज रिव्हर्ट करतांना खऱ्खोड कोड नाही, जुळत नाही, पासबुक-सातबारा-खातेक्रमांक स्पष्ट दिसत नाही, शेतकऱ्यांचे-बँकेचे नाव जुळत नाही असे व इतर कारणे देऊन शेतकऱ्यांनी भरलेले पीकविम्याचे अर्ज त्रुटीत काढणे, या त्रुटी नसून शेतकऱ्यांना पीकविम्यापासून वंचित ठेवण्या डाव आहे. तो रद्द करून दुष्काळात सर्वच शेतकऱ्यांना पीकविमा मंजूर केला पाहिजे.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुनील कुलकर्णी, विकास पाटील धामणगावकर, कोळगावचे सरपंच श्रीराम, गजानन पाटील जांभळीकर, बालाजी पाटील आदी उपस्थित होते.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९६४/२०२६
अर्जुन व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. जी.पी.गवारे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **महादेव गणपत होडशीळ**, हे / हया दिनांक १८/०४/२०२१ रोजी **गुळज, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ अर्जुन महादेव होडशीळ, वय ३८ वर्षे, धंदा-शेती, रा. गुळज, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ कुसुम भ्र. महादेव होडशीळ, वय ७० वर्षे, धंदा - शेती, रा. गुळज, ता. गेवराई जि. बीड**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १७/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०४/२०२६
प्रदिप व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आर ए.कोळेकर, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **धोंडीराम पि.जिजा काशीद**, हे / हया दिनांक २९/०२/२००४ रोजी **मौजे कोळगांव, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ प्रदिप पि. आसाराम काशीद, वय ३६ वर्षे, धंदा-शेती, रा. कोळगांव, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ ललीता भ्र. राजु बुलबुले, वय ५४ वर्षे, धंदा - शेती, रा. भनंद जळगांव, ता.अंबड, जि. जालना**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०२/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९१९/२०२६
सिताबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. ए.एस.नाकाडे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **रामा सावळीराम धायतडक**, हे / हया दिनांक ०१/१२/२०२१ रोजी **मौजे वडगांव ढोक, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ सिताबाई भ्र. रामा धायतडक, वय ५७ वर्षे, धंदा-शेती, रा. वडगांव ढोक, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ सुवर्णा भ्र. गोविंद बांगर, वय २९ वर्षे, धंदा - शेती, रा. जवाहरवाडी, ता.गेवराई, जि.बीड अर्जदार क्र. ३ अंबादास पि. रामा धायतडक, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. वडगांव ढोक, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ४ प्रियंका भ्र. अंकुश व्हर्षळ, वय २७ वर्षे, धंदा-शेती, रा.पैठण, जि. पैठण, जि. छ. संभाजीनगर.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०३/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२१/२०२६
द्रोपती व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. ए.एस.पंडीत, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **भगवान पि. लिंबाजी नागरगोजे**, हे / हया दिनांक १०/०२/२०२२ रोजी **मौजे शेकटा, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ द्रोपती भ्र. रमाकांत जवरे, वय ७८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जवरवाडी, ता. गेवराई जि. बीड , अर्जदार क्र. २ अर्जुन पि.भगवान नागरगोजे, वय ६४ वर्षे, धंदा - शेती, रा.शेकटा, ता.गेवराई जि.बीड**

विरुध्द

गैरअर्जदार - शिवाजी पि.भगवान नागरगोजे, वय ६२ वर्षे, धंदा-शेती, रा.शेकटा, ता. गेवराई, जि.बीड.

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०३/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७६७/२०२६
दगडु वि. ग्रामसेवक ग्रा.आमला वाहेगाव
(मार्फत बी.ई.खरात)

ज्याअर्थी अर्जदार नामे **दगडु पांडुरंग गोरे, वय ५८ वर्षे, धंदा-शेती, रा. आमला वाहेगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, आमला वाहेगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचे वडील नामे वडील पांडुरंग दगडु गोरे, दि.०४/१०/२०२३ , व आई नामे सोनाबाई भ्र. पांडुरंग गोरे** दि.२९/०८/२०१९ रोजीची **यांच्या** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १५/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .६४१/२०२६
सूर्यनारायण वि. ग्रामसेवक ग्रा.वंजारवाडी

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुर्यनारायण नानाभाऊ बरडे, वय ३८ वर्षे, धंदा-मजुरी, रा. वंजारवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वंजारवाडी, ता.गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार **यांची मुलगी नामे वैष्णवी सुर्यनारायण बरडे** यांच्या दि. २२/०३/२०१६ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक:१७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/११/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .९३९/२०२६
सोतनाथ वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय आडपिंपरी/बुमेगाव
(मार्फत ॲड.एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सोमनाथ सुभाष गलधर, वय ३६ वर्षे, धंदा-शेती, रा. आडपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय आडपिंपरी/बुमेगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची मुलगी नामे अनुष्का पि.सोमनाथ गलधर, यांच्या** दि.२६/०२/२०२२ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे, व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक: २८/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर. ए. मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७९५/२०२६
मोशीन वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय हिवरवाडी
(मार्फत ॲड.एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **मोशीन शफिक सय्यद, वय २० वर्षे, धंदा-शिक्षण, रा. हिवरवाडी, ता. गेवराई, जि. बीड, ह.मु. रू.नं. ४३ आदर्श रमाई नगर, बी.ए.डी. रोड, वडाळा पुर्व, मुंबई** यानी येथे गैरअर्जदार **ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरवाडी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदार यांनी स्वतः नामे **मोशीन शफिक सय्यद** यांच्या दि. १२/०८/२००६ रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४८१/२०२६
सुर्गीव वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय आमला
(मार्फत एल.जी.कुलकर्णी)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुर्गीव केरूबा होंडे, वय ६० वर्षे, रा. आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांचे वडील नामे **केरूबा किसन होंडे यांची** दि. १५/०५/१९८० रोजीची मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ०२/११/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७८७/२०२६
सुदाम वि. ग्रामसेवक ग्रा. कार्यालय आमला

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुदाम भुजंगराव गोरे, वय ३८ वर्षे, धंदा-शेमी, रा.आमला, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय आमला, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार यांची मुलगी नामे **श्रुति सुदाम गोरे यांची** दि. ०१/०७/२०१० रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १९/१२/२०२६

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026
पान -५
PAGE - 5

उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणामुळे सुमारे दोन टीएमसी पाण्याची बचत - जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

मराठवाड्यातील पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाययोजनांसाठी नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य

छत्रपती संभाजीनगर (विमाका)

जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातून पाणी वितरण करताना सुमारे ४० टक्के पाणीहानी होत आहे. उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणामुळे सुमारे दोन टीएमसी पाण्याची बचत होत असून, त्याचप्रमाणे डाव्या कालव्यातील पाणीहानी कमी करण्यासाठी सुधारणा महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करून सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल, असे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयात कालवा सल्लागार समित्यांच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी जायकवाडी प्रकल्पातील उपलब्ध जलसाठा, कालव्यांमधील पाणी वितरण, पाणीहानी कमी करण्याच्या उपाययोजना आणि मराठवाड्यातील दीर्घकालीन पाणी नियोजनाबाबत माहिती दिली.

जायकवाडी प्रकल्पात सध्या सुमारे ५८ टीएमसी जलसाठा असल्याची माहिती डॉ. विखे पाटील यांनी दिली. यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी पाणी देण्यात आले आहे. उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येत असून, सिंचनासाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यावर भर असल्याचे त्यांनी सांगितले.

कालव्यांमधून पाणी वितरण करताना शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी पाणी वितरणात शिस्त राखणे आणि पाणीहानी कमी करणे महत्त्वाचे आहे. कालव्याच्या शेवटच्या भागापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणी मान्य करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठवाड्यातील पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी गोदावरी खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्याच्या नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे. या प्रकल्पांसाठी पाण्याची उपलब्धता, सर्वेक्षण आणि आवश्यक पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने नियोजन सुरू असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

केवळ अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देणे पुरेसे नसून त्या पाण्याच्या साठवणुकीसाठी आणि संबंधित भागांपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक व्यवस्था उभारणेही महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने विविध प्रकल्पांचे नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



राज्यातील दुष्काळी भागांना शाश्वत पाणीपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे. वैनगंगा-नळगंगा यांसारख्या नदीजोड प्रकल्पांचाही त्यांनी यावेळी संदर्भ दिला.

उपलब्ध जलसंपत्तीचे योग्य नियोजन, कालव्यांमधील पाणीहानी कमी करणे आणि अतिरिक्त पाण्याचे स्रोत निर्माण करणे या उपाययोजनांच्या माध्यमातून दुष्काळी भागांसाठी दीर्घकालीन पाणी उपलब्धता निर्माण करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

दिव्यांग सेवाकार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल.!

साईनाथ पवार मानद डॉक्टरेट पदवीसह 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरवांकित

धर्माबाद / अशोक पडोळे

दिव्यांग बांधवांच्या सेवेसाठी अनेक वर्षांपासून समर्पित भावनेने कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते साईनाथ पवार यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत लुइझियाना रिसर्च युनिव्हर्सिटीच्या वतीने दिव्यांग क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून पुणे येथे सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्याचा हा गौरव संपूर्ण दिव्यांग क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

विशेष म्हणजे, साईनाथ पवार हे स्वतः दिव्यांग असूनही त्यांनी आपल्या शारीरिक मर्यादांवर मात करत अनेक वर्षांपासून दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी, विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य केले आहे. दिव्यांगांच्या समस्या जाणून घेणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, विविध शैक्षणिक व प्रशिक्षण उपक्रमांमध्ये सहभाग घेणे, तसेच दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

सामाजिक कार्यासोबतच विविध शैक्षणिक व प्रशिक्षण उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी आपले ज्ञान आणि कौशल्य अधिक समृद्ध केले आहे. त्यांच्या याच सेवाभावी कार्याची आणि उल्लेखनीय कर्तृत्वाची दखल घेत त्यांना मानद डॉक्टरेट पदवीने गौरविण्यात आले.

याच उल्लेखनीय कामगिरीबद्दल भारतीय अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने साईनाथ पवार यांना पुणे येथे प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात





आले.

स्वतः दिव्यांग असूनही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत समाजसेवेचा आदर्श निर्माण करणारे साईनाथ पवार यांचे हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या दुहेरी सन्मानामुळे महाराष्ट्रातील दिव्यांग बांधव, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

संघर्षाला जिद्दीची जोड आणि सेवेला समर्पणाची साथ मिळाली, तर यशाची शिखरे गाठता येतात, याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे साईनाथ पवार.!



दुष्काळात बचत गटांच्या महिलांची सक्तीची कर्जवसुली थांबवा, जिल्हाधिकाऱ्यांचा बँकांना इशारा

बीड / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असताना विविध बँकांकडून बचत गटांच्या महिलांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महिलांना दिलासा मिळावा यासाठी शिवसेनेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

बीड शहरातील विविध बचत गटांच्या महिलांनी शिवसेना अल्पसंख्याक महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा यासमीन बाजी शेख यांच्यासह शिवसेनेच्या मदत केंद्रात धाव घेतली. यावेळी केंद्रावर कार्यरत शिवसैनिकांनी जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांना महिलांच्या समस्यांची माहिती दिली.

या तक्रारींची तातडीने दखल घेत जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी संबंधित महिलांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, महिलांची आर्थिक अडचण आणि बँकांकडून सुरू असलेल्या कथित जाचक कर्जवसुलीचा प्रश्न सविस्तरपणे मांडण्यात आला.महिलांची व्यथा ऐकल्यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी त्यांना दिलासा देत स्पष्ट शब्दांत सांगितले की, सक्तीच्या कर्जवसुलीसाठी कोणी घरी आले तर मला तात्काळ फोन करा. संबंधितांवर गुन्हा दाखल केल्याशिवाय राहणार नाही.जिल्हाधिकाऱ्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थित महिलांना मोठा दिलासा मिळाला. यावेळी महिलांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन आणि अल्पसंख्याक महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा यासमीन बाजी शेख यांचे आभार मानले. तसेच गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या अडचणीच्या काळात शिवसेना पक्ष व उद्धवसाहेबच खऱ्या अर्थाने आधार देत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी तालुका सचिव नंदुभाऊ येवले, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, उद्योजक सुनील इंगळे यांच्यासह विविध जाती-धर्मांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या माध्यमातून बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने मराठा वृद्ध कुटुंबांला मदतीचा हात

वृध्द मराठा कुटुंबाच्या अश्रू पुसण्यासाठी एकनाथ शिंदे साहेब बनले अनाथांचे नाथ

बीड ।प्रतिनिधी

मराठा समाजातील एक कुटुंब आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी झुंज देणारे, संघर्षमय परिस्थितीतून मार्ग काढणारे बाबुराव लिंबाजी कदम आणि सुभाबाई बाबुराव कदम हे वृद्ध दाम्पत्य सध्या मदतीच्या प्रतीक्षेत होते. दोन मुले आणि तब्बल १२ एकर शेती असूनही या कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी संघर्ष करावा लागत असल्याची बाब समोर आली आहे. या वृद्ध दाम्पत्याची परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, अनेकदा त्यांना अंधारात रात्र काढावी लागत आहे. आयुष्याच्या संध्याकाळी ज्या वयात सुखाने दिवस काढण्याची वेळ असते, त्या वयात या दाम्पत्याला मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागत आहे. वय झाले, आता पूर्वीसारखे काम करणे शक्य नाही, मग घरात रेशन आणायचे कुठून? उदरनिर्वाह कसा करायचा? असे अनेक प्रश्न या वृद्ध दाम्पत्यापुढे उभे राहिले होते. घरात दोन मुले आणि तब्बल १२ एकर शेती असूनही वृद्ध आई-वडिलांच्या वाट्याला मात्र संघर्षाचे जीवन आल्याचे चित्र समोर आले आहे.

आपल्या अडचणी दूर व्हाव्यात, या अपेक्षेने या वृद्ध दाम्पत्याने प्रशासनाकडे धाव घेतली होती. मात्र, कुटुंबातील दोन मुले असूनही वृद्ध आई-वडिलांकडे दुर्लक्ष होत असल्याची परिस्थिती समोर आली. वृद्धापकाळात आधाराची गरज असताना त्यांना अंधारात रात्र काढावी लागत आहे, तर दुसरीकडे उदरनिर्वाहासाठी लागणाऱ्या अन्नधान्याचीही चिंता सतावत आहे. या दाम्पत्याची व्यथा ऐकून कोणाचेही मन हेलावून जाईल. ही बाब युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेतली. गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेले बाजीराव दादा चव्हाण यांनी या वृद्ध दाम्पत्याची व्यथा समजून घेतली. केवळ सहानुभूती व्यक्त न करता त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्यापर्यंत या वृद्ध दाम्पत्याची व्यथा पोहोचवली. त्यांच्या माध्यमातून या कुटुंबाला मदतीचा हात देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. अंधारात रात्र काढणाऱ्या, रेशनसाठी चिंता करणाऱ्या आणि वृद्धापकाळात आधाराच्या प्रतीक्षेत असलेल्या या दाम्पत्याला मदतीचा दिलासा मिळावा, यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

आता बाजीराव दादा चव्हाण स्वतः बोडका येथील या वृद्ध दाम्पत्यापर्यंत पोहोचून



त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या परिस्थितीची पाहणी करणार असून, त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. वय झाले म्हणून हातपाय थकले, काम करण्याची ताकद उरली नाही; मात्र जगण्याची गरज आणि पोटाची भूक काही थांबत नाही. अशा परिस्थितीत या वृद्ध दाम्पत्याच्या पाठीशी उभे राहण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा ठरत आहे.

आज समाजात अनेकदा नाती असूनही माणूस एकटा पडतो. घरात मुलं असूनही वृद्ध आई-वडिलांना अन्नधान्य, निवारा आणि दैनंदिन गरजांसाठी संघर्ष करावा लागतो, ही बाब समाजासाठी चिंतनाची आहे. आयुष्यभर कुटुंबासाठी कष्ट करणाऱ्या आई-वडिलांना वृद्धापकाळात आधार मिळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

अनाथांचे नाथ एकनाथजी शिंदे साहेब यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि बाजीराव दादा चव्हाण यांच्या जनसेवेच्या भावनेतून एका गरजू मराठा कुटुंबाला आधार देण्याचा हा माणुसकीचा प्रयत्न ठरत आहे!

राजकारण केवळ पदासाठी नाही, तर सामान्य माणसाच्या दुःखात सहभागी होऊन त्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी असते. अंधारात रात्र काढणाऱ्या या वृद्ध दाम्पत्याच्या आयुष्यात मदतीचा प्रकाश पोहोचवण्यासाठी पुढे आलेले एकनाथ शिंदे साहेब आणि बाजीराव दादा चव्हाण यांचा हा पुढाकार माणुसकीचे दर्शन घडवणारा ठरत आहे!

राज्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी कृषी विभागाकडून उपाय योजना

कृषी विभागाचे मार्गदर्शक शासन परिपत्रक जारी

छत्रपती संभाजीनगर (विमाका)

राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने कृषी विभागाने विविध उपाययोजना निश्चित केल्या आहेत. यामध्ये चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य, शासकीय जमिनीवर चारा उत्पादन आणि उपलब्ध यंत्रसामग्रीच्या वापरावर भर देण्यात आला आहे. यासंदर्भात कृषी विभागाने दि. २ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शक शासन परिपत्रक निर्गमित केले आहे.

राज्यात नैर्ऋत्य मोसमी पावसातील तूट, पावसाचे असमान वितरण आणि खरीप पिकांच्या उत्पादनात झालेली घट यामुळे रब्बी हंगामात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन या उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत.

रब्बी हंगामात चारा पिकांसाठी आवश्यक बियाण्यांची जिल्हानिहाय व पीकनिहाय मागणी पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने निश्चित करण्यात येणार आहे. महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ तसेच संबंधित संस्थांच्या माध्यमातून बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी कार्यवाही करण्यात येईल.

कमी पाण्यात येणारी, कमी कालावधीत उत्पादन देणारी आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणारी चारा पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि सिंचनाच्या उपलब्धतेनुसार योग्य पिकांची शिफारस करण्यात येईल.

स्थानिक परिस्थितीनुसार मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, सुगरग्रेज आदी चारा पिकांच्या लागवडीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. सिंचनाची सुविधा असलेल्या क्षेत्रात चारा उत्पादन वाढविण्यासाठी खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, योग्य कापणी आणि चाऱ्याची साठवणूक यावर भर दिला जाणार आहे.

चारा पिकांचा उत्पादन खर्च, अपेक्षित उत्पादन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चाऱ्याचे संवर्धन व मूल्यवर्धन याबाबत शेतकरी प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येतील. यासाठी कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विद्यापीठे आणि पशुसंवर्धन विभागाचा सहभाग राहणार आहे.

कृषी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे आणि महाबीजच्या उपलब्ध जमिनीचा आढावा घेऊन योग्य क्षेत्रावर चारा पिकांची प्राधान्याने लागवड करण्यात येणार आहे. तसेच हायड्रोपोनिक, अझोला आणि बिनकाटेरी निवडुंग लागवडीसारख्या पर्यायी चारा उत्पादन पद्धतींबाबत कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून कार्यक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील कस्टम हायरिंग सेंटर आणि कृषी औजारे बँकांमधील उपलब्ध यंत्रसामग्रीची माहिती शेतकरी व पशुसंवर्धन विभागाला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच चारा उपलब्धता असलेल्या क्षेत्रांचे मॅपिंग, पीकनिहाय पेरणी क्षेत्र आणि अपेक्षित उत्पादनाची माहिती संकलित करून चारा उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांचे नेटवर्क तयार करण्यात येईल.

या सर्व उपाययोजनांची कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी विभागीय, जिल्हा आणि तालुका स्तरावर समन्वयाने अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. कृषी आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाहीचा नियमित आढावा घ्यावा, असेही शासन परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने कृषी विभागाने विविध उपाययोजना निश्चित केल्या आहेत. यामध्ये चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य, शासकीय जमिनीवर चारा उत्पादन आणि उपलब्ध यंत्रसामग्रीच्या वापरावर भर देण्यात आला आहे. यासंदर्भात कृषी विभागाने दि. २ नोव्हेंबर रोजी मार्गदर्शक शासन परिपत्रक निर्गमित केले आहे.

मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांना 'शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान

मैत्रा फाउंडेशनच्या वतीने बीड येथे सन्मान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहून विविध नावीन्यपूर्ण शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आपला वेगळा ठसा उमटविणारे आष्टी तालुक्यातील सुदर्शन विद्यालय, सांगवी पाटणचे आदर्श मुख्याध्यापक श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांना सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. मैत्रा फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात येणारा हा पुरस्कार रविवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बीड येथे आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराचे वितरण राज्य कार्यवाह, विवेक वाहिनी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मा. प्राचार्य डॉ. सविता शेटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी दैनिक लोकप्रश्न, बीडचे संपादक श्री. दिलीप ख्रिस्ती, गेवराईचे विस्तार अधिकारी श्री. प्रवीण काळम पाटील, राष्ट्रपती पुरस्कार २०२६ प्राप्त शिक्षिका डॉ. कविता गीते, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था, बीडचे अध्यक्ष श्री. विजय खोसे, लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था, शिरूरचे अध्यक्ष श्री. मधुकर सानप, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी



पतसंस्था, बीडचे सचिव तथा केंद्रप्रमुख श्री. गोविंद वायकर आणि मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष द. ल. वारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मैत्रा फाउंडेशन, महाराष्ट्र ही संस्था साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण आणि सामाजिक सेवा अशा विविध क्षेत्रांत कार्यरत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. द. ल. वारे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. याच उपक्रमांतर्गत शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न, नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सुदर्शन विद्यालय, सांगवी पाटणचे मुख्याध्यापक श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांची यंदाच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. मुख्याध्यापक म्हणून कार्य करताना शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रम राबविण्याबरोबरच शिक्षण आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत पुरस्काराने गौरविण्यात आल्याने आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र भूषण, शिक्षणमहर्षी तथा माजी आमदार श्री. भीमरावजी धोंडे साहेब, आईसाहेब सौ. दमयंतीताई धोंडे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. श्री. अजयदादा धोंडे, श्री. अभय राजे धोंडे, प्रशासन अधिकारी श्री. शिवदास विधाते, डॉ. डी. बी. राऊत, श्री. माऊली बोडखे, श्री. संजय शेंडे, श्री. सागर वाघुले आणि श्री. संदीप नन्नवरे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर त्यांचे मित्र श्री. शिवमूर्ती कुडके, श्री. ड. प्रभाकर आंधळे, श्री. बळीराम भोसले, श्री. प्रा. संजय काळे आणि श्री. प्रा. दिलीप बनसोडे यांनी बीड येथे त्यांचा यथोचित भव्य सत्कार करून आनंद व्यक्त केला. तसेच हनुमान विद्यालय, घाटा पिंपरीचे प्राचार्य श्री. सुभाष तरटे यांनी डोईठाण येथे त्यांचा विशेष सत्कार केला.शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, मित्रपरिवार, नातेवाईक, शिक्षण क्षेत्रातील सहकारी, विद्यार्थी, पालक तसेच आनंदवाडी, सराटेवडगाव आणि सांगवी पाटण परिसरातील नागरिकांनीही श्री. साईनाथ कारभारी बोडखे यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या राज्यस्तरीय सन्मानामुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026

पान -६
PAGE - 6

कारखान्याचा विस्तार करुन शेतकऱ्यांना शेजारील कारखान्यांप्रमाणे उसाला चांगला भाव देणार-मा.आ.भीमराव धोंडे

महेश सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील कडा येथील महेश सहकारी साखर कारखान्याचा सन २०२६-२७ या गळीत हंगामाचा शुभारंभ अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध अडचणींवर मात करून सुरू झालेला हा कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आशेचा नवा किरण ठरणार असून, स्थानिक बेरोजगार युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच परिसरातील आर्थिक उलाढालीलाही चालना मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे कार्यकारी संचालक गिरीश झगडे यांनी केले. यावेळी कारखान्याचे चेअरमन डॉ. अजयदादा धोंडे यांनी मनोगत व्यक्त करताना कारखाना सुरू करण्यासाठी आलेल्या अडचणी, त्यावर केलेली मात, कारखान्याची आजवरची वाटचाल, भविष्यातील विस्ताराचे नियोजन आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती दिली. कारखाना सक्षमपणे चालविण्यासाठी शेतकरी, सभासद, कामगार आणि सर्व संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, आष्टी, पाटोदा आणि शिरूर या तीनही तालुक्यांमध्ये पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने या मतदारसंघाला बाहेरून पाणी आणण्याची नितांत गरज आहे. महेश सहकारी साखर कारखाना उभारण्याचे काम यापूर्वीच्या नेतृत्वाने सुरू केले होते. मात्र, तो सुरळीतपणे सुरू करण्यासाठी आणि मतदारसंघाच्या विकासासाठी आपण महाभारतातील पाच पांडवांमधील भीमाप्रमाणे ताकदीने प्रयत्न केले आहेत. कारखान्याचा विस्तार करणे ही काळाची गरज असून, भविष्यात त्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. शेतकऱ्यांच्या उसाला शेजारील साखर कारखान्यांप्रमाणे चांगला भाव देण्याचा आपला प्रयत्न राहील. तसेच कारखान्यातील जुन्या कर्मचाऱ्यांची थकीत वेतनाची रक्कम टप्प्याटप्प्याने अदा करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कारखान्याच्या उभारणीपासूनचा राजकीय आणि सामाजिक प्रवास उलगडत त्यांनी



शेतकरी बांधवांनी कारखान्याला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी सांगितले की, अनेक अडचणींचा सामना करून धोंडे साहेबांनी हा कारखाना सुरू केला आहे. हा आपल्या सर्वांच्या हक्काचा कारखाना असून, त्याच्या माध्यमातून परिसरातील युवकांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी धोंडे साहेबांनी धाडसाने कारखाना सुरू केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. कारखान्याच्या प्रगतीसाठी आपण सर्वजण सहकार्य करू, अशी ग्वाही देतानाच फळसाठवण तलावामध्ये पाणी आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनेसाठी थेट पाइपलाइनचा प्रस्ताव दाखल करून तो मंजूर करून घेण्यात आपला सहभाग असल्याचे नमूद करत हे पाणी उपलब्ध झाल्यास ऊस लागवडीखालील क्षेत्र वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्या दुष्काळी परिस्थिती असली तरी भविष्यात पाऊस चांगला झाल्यास महेश सहकारी साखर कारखान्याला निश्चितच चांगले दिवस येतील, असेही ते म्हणाले.

माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने आणि एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. कारखाना सुरू झाल्यामुळे परिसरातील बेरोजगारांना रोजगार मिळेल, स्थानिक बाजारपेठेत आर्थिक उलाढाल वाढेल आणि तालुक्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. शेतकरी सुजलाम् सुफलाम् व्हावेत

जायकवाडीच्या पाण्याने रब्बी हंगामाला मिळणार बळ!

भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांच्या मागणीला यश; शेतीसाठी चार आवर्तने मंजूर

पहिले आवर्तन ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार; मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

घुंगर्डे हादगाव । बंडू शिंगटे :

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. जायकवाडी धरणातून रब्बी हंगामासाठी तीन, तर उन्हाळी हंगामासाठी एक अशी एकूण चार पाणी आवर्तने शेतीसाठी मंजूर करण्यात आली आहेत. यामुळे रब्बी पिकांच्या सिंचनाचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागण्याची अपेक्षा असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जायकवाडी धरणातून रब्बी हंगामासाठी तीन पाणी आवर्तने देण्याचे नियोजन करण्यात आले असून, पहिले आवर्तन ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार असल्याची माहिती आहे. या निर्णयामुळे गहू, हरभरा, ज्वारी यांसह अन्य रब्बी पिकांना पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, भाजपा नेते मा. सतीश घाटगे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या



हितासाठी जायकवाडीच्या पाण्याची आवर्तने मंजूर करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती. त्यांच्या मागणीला अखेर यश आल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन आणि वेळेवर आवर्तन मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. धरणातील पाण्याचा शेतीसाठी प्रभावी वापर झाल्यास रब्बी हंगामातील उत्पादन वाढण्यास हातभार लागेल.

जायकवाडीच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शिवारात पुन्हा हिरवळ फुलण्याची आशा निर्माण झाली असून, चार आवर्तनांच्या निर्णयाकडे मराठवाड्यातील शेतकरी मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत.



दीपावलीत जालनेकरांना नियमित पाणीपुरवठा अन् प्रकाशमान शहर द्या!

बंद पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची शिवसेना शिष्टमंडळाची आयुक्तांकडे मागणी

जालना, शेख फारुक : दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील स्वच्छता, नियमित व पुरेसा पाणीपुरवठा तसेच बंद अवस्थेतील पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी शिवसेनेच्या नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आयुक्तांच्या दालनात भेट घेऊन शहरातील मूलभूत नागरी सुविधांकडे लक्ष वेधले. दीपावली हा आनंद आणि प्रकाशाचा सण असल्याने या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शहरातील सर्व प्रभागांमध्ये नियमित साफसफाई करून विशेष स्वच्छता मोहीम राबवावी. सणासुदीच्या काळात घराघरांत स्वच्छता केली जात असल्याने पाण्याची मागणी वाढते. त्यामुळे नागरिकांना पुरेशा प्रमाणात आणि नियमित पाणीपुरवठा करावा. तसेच शहरातील अनेक भागांतील बंद असलेले पथदिवे तातडीने दुरुस्त करून संपूर्ण शहर प्रकाशमान करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या शिष्टमंडळात महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक निखिल पगारे, अश्विन भास्करराव अंबेकर, दिनेश भगत, दुर्गेश काठोटीवाले, किशोर पांगारकर, अमोल ठाकूर आदींचा समावेश होता.

सणाच्या काळात नागरिकांना स्वच्छता, पाणी आणि प्रकाश या मूलभूत सुविधांसाठी त्रास सहन करावा लागू नये. महापालिका प्रशासनाने मागण्यांची तातडीने दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शिवसेना शिष्टमंडळाने व्यक्त केली.

आ.सुरेश धस यांची शासनाकडे आग्रही मागणी;दोन हेक्टरपर्यंत अनुदानाची मर्यादा निश्चित करण्याचीही मागणी

दुष्काळात फळबागा जगविण्यासाठी हेक्टरी ६० हजारांचे अनुदान द्या

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर फळबागा जगविण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. पाण्याअभावी वर्षानुवर्षे कष्ट, मेहनत आणि मोठे भांडवल खर्च करून उभ्या केलेल्या फळबागा वाळण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे फलोत्पादक शेतकऱ्यांना भविष्यातील उत्पन्नाची चिंता सतावत आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने हेक्टरी ६० हजार रुपये अनुदान द्यावे, तसेच एका शेतकऱ्याला कमाल दोन हेक्टर क्षेत्रापर्यंत अनुदानाची मर्यादा निश्चित करावी, अशी आग्रही मागणी आमदार सुरेश धस यांनी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत केली.

सन २०१२ मध्ये राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी फळबागा जगविण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना हेक्टरी ३० हजार रुपये अनुदान दिले होते. त्याच धर्तीवर सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, पाणीपुरवठ्याचा खर्च आणि पाण्याची तीव्र टंचाई लक्षात घेता यंदा हेक्टरी ६० हजार रुपये अनुदान देणे आवश्यक असल्याचे आमदार धस यांनी बैठकीत स्पष्ट केले. हे अनुदान व्हीबी-जी राम जी योजना अथवा कृषी विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावे, अशी सूचनाही त्यांनी मांडली.

आमदार सुरेश धस यांच्या या मागणीला रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेच्या अनुषंगाने या मागणीबाबत योग्य धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास मंत्र्यांनी व्यक्त केला. त्यामुळे दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या फळबाग उत्पादक शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

आष्टी विधानसभा मतदारसंघात मागील दहा-बारा वर्षांत फळबाग लागवडीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. मतदारसंघातील अनेक गावांमध्ये डाळिंब, मोसंबी, सीताफळ यांसह विविध फळपिकांच्या बागा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन बनल्या आहेत. पारंपरिक पिकांच्या तुलनेत फळबाग शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला असून, अनेकांनी या शेतीसाठी मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. मात्र, यंदाच्या भीषण दुष्काळामुळे फळबागांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.

फळबागांना ऊस पिकाच्या तुलनेत पाण्याची गरज कमी असली, तरी सध्याच्या परिस्थितीत ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाणी देऊन झाडे जगविणेही शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण झाले आहे. विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांची पाणीपातळी खालावल्याने उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना शेतकऱ्यांची मोठी कसरत होत आहे. अनेक ठिकाणी पाण्याअभावी फळझाडे सुकण्यास सुरुवात झाली असून, वेळेत मदत मिळाली नाही तर मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

फळबाग उभी करणे ही एक-दोन वर्षांची प्रक्रिया नसून त्यासाठी अनेक वर्षे मेहनत, सातत्यपूर्ण देखभाल, आर्थिक गुंतवणूक आणि संयम आवश्यक असतो. एकदा बाग उभी राहिल्यानंतर त्यातून शेतकऱ्यांना अनेक वर्षे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा असते. मात्र, दुष्काळामुळे झाडे वाळली तर शेतकऱ्यांचे केवळ चालू हंगामातील उत्पन्नच बुडणार नाही, तर नव्याने फळबाग उभी करण्यासाठी पुन्हा मोठा खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे फळबागांचे संरक्षण करणे ही शासनाची प्राधान्याची बाब ठरावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

या मागणीसंदर्भात झालेल्या बैठकीस मंत्रालयातील रोजगार हमी योजना विभागाचे सचिव, विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण), नागपूरचे आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे येथील फलोत्पादन संचालक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आमदार धस यांनी दुष्काळी परिस्थितीमुळे फळबाग उत्पादक शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची वस्तुस्थिती मांडत अनुदानाची आवश्यकता



अधोरेखित केली.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना केवळ आश्वासन न देता त्यांच्या हाताला प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे. विशेषतः फळबागा जगविण्यासाठी वेळेत निधी उपलब्ध झाला, तर शेतकऱ्यांचे भविष्यातील मोठे आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. त्यामुळे हेक्टरी ६० हजार रुपये अनुदान आणि एका शेतकऱ्याला दोन हेक्टरपर्यंत अनुदानाची मर्यादा निश्चित करण्याच्या आमदार सुरेश धस यांच्या मागणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शासन दरबारी शेतकऱ्यांच्या अडचणी मांडून त्यांच्या फळबागा वाचविण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी पुढाकार घेतला आहे. आता मंत्री भरतशेठ गोगावले यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर शासन याबाबत किती लवकर निर्णय घेते, अनुदानाची तरतूद कशी करते आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत कधी पोहोचते, याकडे आष्टीसह राज्यातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

प्रत्येक संकटात महेश कारखाना सदैव पाठीशी उभा राहील! - माजी आमदार भीमराव धोंडे यांची ग्वाही

२०२६-२७ च्या गळीत हंगामाचा उत्साहात शुभारंभ; शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासह मतदारसंघातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार

आष्टी - (एस. राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील महेश सहकारी साखर कारखाना हा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात आणि प्रत्येक संकटात सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिली. कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले असून, भविष्यातही शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीच्या विकासासह मतदारसंघातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कडा येथील महेश सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे आष्टी तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, राजेंद्र धोंडे, अभय राजे धोंडे, आरपीआयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ वनवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

गळीत हंगामाच्या शुभारंभानिमित्त उपस्थित मान्यवरांनी सहकार क्षेत्राची भूमिका, साखर उद्योगासमोरील बदलती आव्हाने, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सहकारी साखर कारखान्यांचे महत्त्व यावर आपले विचार मांडले. कारखाना हा केवळ साखर उत्पादनाचा उद्योग नसून त्याच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, ऊसतोड मजूर, वाहतूकदार आणि परिसरातील विविध घटकांना रोजगार व आर्थिक आधार मिळतो. त्यामुळे कारखान्याची प्रगती ही परिसराच्या आर्थिक विकासाशी जोडलेली असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी महेश सहकारी साखर कारखाना सुरळीत आणि यशस्वीपणे चालविण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले. शेतकरी, सभासद, कामगार, ऊसतोड मजूर, वाहतूकदार आणि संबंधित घटकांनी कारखान्याच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करावे. सर्वांच्या सहकार्यानेच कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी होऊ शकतो, असे आवाहन त्यांनी केले.

माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी आष्टी मतदारसंघातील पाणीप्रश्नावर आपले विचार मांडले. पाणी हा शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विषय असून, पाण्याची उपलब्धता वाढल्यास शेतीच्या विकासाला चालना मिळेल. त्यामुळे मतदारसंघातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी बदलत्या काळातील साखर उद्योगासमोरील आव्हानांवर भाष्य केले. साखर उद्योगात टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादन प्रक्रियेत आवश्यक बदल आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साखर उद्योग अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी रामराव खेडकर, पांडुरंग नागरगोजे, नियामत बेग, सतीश शिंदे, अण्णासाहेब चौधरी, सुदाम झिंजुर्के, परमेश्वर शेळके, हरिभाऊ जंजिरे, भाऊसाहेब घुले, राहुल काकडे, काकासाहेब लांबरुड, सुरेश राख, राजपाल शेंडगे, वैभव बडे, त्रिंबक इथापे, संतोष जाधव, बापूसाहेब शिंदे, बाळासाहेब शिंदे, शेख आज्जू, शेख नईम, ड. रिजवान शेख यांच्यासह कारखान्याचे संचालक मंडळ, शेतकरी, सभासद, ऊसतोड मुकादम, वाहतूकदार, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी, सभासद आणि कामगारांच्या सहकार्याने कारखान्याचा २०२६-२७ चा गळीत हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

डॉ.सुजाता पांडुरंग बोडखे आणि डॉ.शुभांगी रमेश बोडखे सख्या चुलत बहिणी बनल्या 'बी.ए.एम.एस.' डॉक्टर

आनंदवाडीसह आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील आदर्श गाव आनंदवाडी (सराटेवडगाव) येथील भूमिपुत्र असलेल्या बोडखे कुटुंबातील दोन सख्या चुलत बहिणींनी वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. सुजाता पांडुरंग बोडखे आणि डॉ. शुभांगी रमेश बोडखे यांनी सन २०२६ मध्ये बी.ए.एम.एस. (आयुर्वेद वैद्यकशास्त्र) पदवी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून डॉक्टर होण्याचा मान मिळविला आहे. एकाच कुटुंबातील दोन मुलींनी वैद्यकीय क्षेत्रात मिळविलेल्या या यशामुळे आनंदवाडीसह संपूर्ण आष्टी तालुक्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आदर्श इंजिनिअर पी. बी. बोडखे यांची कन्या डॉ. सुजाता पांडुरंग बोडखे हिने बीड येथील आदित्य आयुर्वेदिक कॉलेजमधून बी.ए.एम.एस. पदवी परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण केली आहे. आपल्या मेहनतीच्या जोरावर तिने मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. तसेच इंजिनिअर पी. बी. बोडखे यांचे सख्खे बंधू रमेश बाजीराव बोडखे यांची कन्या डॉ. शुभांगी रमेश बोडखे हिने संगमनेर येथील माची हिल परिसरातील आश्विन रुलर आयुर्वेद कॉलेजमधून सन २०२६ मध्ये बी.ए.एम.एस. ही वैद्यकीय पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे.

विशेष म्हणजे, दोघीही सख्या चुलत बहिणी असून एकाच कुटुंबातील दोन मुलींनी वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करून डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे. शिक्षणाची जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन यांच्या बळावर त्यांनी हे यश मिळविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी त्यांचे हे यश प्रेरणादायी आणि अभिमानास्पद आहे. त्यांच्या या यशामुळे आनंदवाडी गावाच्या लौकिकात भर पडली



असून बोडखे कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या दोन्ही गुणवंत डॉक्टरांच्या उज्ज्वल यशाबद्दल महाराष्ट्र भूषण तथा शिक्षणमहर्षी माजी आमदार भीमराव धोंडे साहेब, आईसाहेब सौ. दमयंतीताई धोंडे, डॉ. अजयदादा धोंडे, अभय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, चेअरमन अरुण सायकड, शेख अन्सारभाई, ह.भ.प. निवृत्ती महाराज बोडखे, आजोबा बाजीराव बोडखे, लक्ष्मण बोडखे, रामभाऊ बोडखे, रंगनाथ बोडखे, चेअरमन बबन नन्नवरे, माजी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, सरपंच भीमराव बोडखे, भानुदास बोडखे, विष्णू ससाणे आणि राजेंद्र लाड यांच्यासह परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दोघींचेही अभिनंदन केले आहे. दोन्ही डॉक्टरांनी भविष्यात वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत समाजातील गरजू रुग्णांची सेवा करावी आणि आपल्या कार्यातून कुटुंबासह गावाचे नाव उज्ज्वल करावे, अशा सदिच्छा व्यक्त करून त्यांच्या पुढील वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर युवा नेते जयदत्त भैय्या धस व युवा नेते सागर आप्पा धस यांचा वाढदिवस साधेपणाने होणार साजरा

शुभेच्छांवरील खर्च टाळून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सध्याच्या परिस्थितीत आष्टी विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण परिसर दुष्काळाच्या भीषण संकटाचा सामना करत आहे. अस्मानी संकटामुळे शेतकरी बांधव हतबल झाले असून, अनेक शेतकरी कुटुंबांसमोर आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. अशा परिस्थितीत दिवाळीसारखा आनंदाचा सण साजरा करणेही अनेक कुटुंबांसाठी मोठे आव्हान बनले आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, यंदा वाढदिवसाचा कोणताही उत्सव न करता दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देऊन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय युवा नेते जयदत्त भैय्या धस व युवा नेते सागर आप्पा धस यांनी घेतला आहे.

युवा नेते जयदत्त भैय्या धस यांचा वाढदिवस बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी, तर युवा नेते सागर आप्पा धस यांचा वाढदिवस गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी आहे. दरवर्षी वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, कार्यकर्ते व हितचिंतकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असतो. मात्र, यंदा परिसरातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी बांधवांच्या अडचणींचे गांभीर्य लक्षात घेऊन दोघांनीही वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना जयदत्त भैय्या धस व सागर आप्पा धस म्हणाले की, आज आपल्या परिसरातील अनेक शेतकरी कुटुंबे संकटात आहेत. शेतकऱ्यांच्या घरात आर्थिक अडचणींमुळे दिवाळीचा दिवा कसा उजळणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा वेळी आपण वाढदिवसाचा मोठा सोहळा आयोजित करणे किंवा हार, पुष्पगुच्छ, केक यांसारख्या गोष्टींवर अनावश्यक खर्च करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे आमच्या सर्व कार्यकर्त्यांनी, मित्रपरिवाराने आणि हितचिंतकांनी वाढदिवसानिमित्त हार, पुष्पगुच्छ, केक अथवा इतर कोणत्याही स्वरूपातील सत्कार व शुभेच्छांवर खर्च न करता आपल्या परीने शक्य होईल ती मदत दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांपर्यंत पोहोचवावी. शेतकरी कुटुंबांच्या घरात दिवाळीचा दिवा आनंदाने उजळावा, त्यांच्या लेकरांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे आणि संकटाच्या काळात त्यांना आपणही कोणीतरी सोबत असल्याची जाणीव व्हावी, यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

आमच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या शुभेच्छा, आशीर्वाद आणि आपुलकी आमच्यासाठी अनमोल आहेत. मात्र, यंदा या शुभेच्छांचे रूपांतर एखाद्या गरजू शेतकरी कुटुंबाच्या मदतीत झाले, तर त्यातून मिळणारा आनंद कोणत्याही वाढदिवसाच्या सोहळ्यापेक्षा कितीतरी मोठा असेल. कारण वाढदिवसाचा खरा आनंद स्वतःच्या चेहऱ्यावर हसू आणण्यात नसून, संकटात सापडलेल्या दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात आहे, अशी संवेदनशील भावना जयदत्त भैय्या धस व सागर आप्पा धस यांनी व्यक्त केली. वाढदिवसाच्या शुभेच्छांपेक्षा गरजूंच्या



चेहऱ्यावरील आनंद अधिक मोलाचा, हा सामाजिक संदेश देत दोन्ही युवा नेत्यांनी यंदाचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या आवाहनामुळे वाढदिवसाच्या निमित्ताने दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जायकवाडीतून शेतीसाठी चार पाणी आवर्तने मंजूर; आमदार हिकमत उढाण यांच्या पाठपुराव्याला यश

रब्बी हंगामात तीन, तर उन्हाळ्यात एक आवर्तन; ५ नोव्हेंबरपासून कालव्याद्वारे पाणी सोडणार

घनसावंगी, मारोती सावत : घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. जायकवाडी (पैठण) येथील नाथसागर धरणातून शेतीच्या सिंचनासाठी एकूण चार पाणी आवर्तने मंजूर करण्यात आली आहेत. यामध्ये रब्बी हंगामासाठी तीन, तर उन्हाळी हंगामासाठी एका आवर्तनाचा समावेश आहे. आमदार हिकमत दादा उढाण यांनी यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जायकवाडी धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याद्वारे शेतीसाठी चार आवर्तने देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मंजूर वेळापत्रकानुसार पहिले आवर्तन ५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६, दुसरे आवर्तन १५ डिसेंबर २०२६ ते ८ जानेवारी २०२७, तिसरे आवर्तन फेब्रुवारी २०२७ मध्ये, तर चौथे आवर्तन उन्हाळी हंगामात देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, येत्या ५ नोव्हेंबरपासून कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येणार असून, गोदावरी नदीवरील सर्व बंधाऱ्यांमध्येही पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

घनसावंगी विधानसभा मतदारसंघासह परिसरातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात सिंचनासाठी पाणी उपलब्ध



व्हावे, पिकांना जीवदान मिळावे आणि दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीचे नुकसान टाळता यावे, यासाठी आमदार हिकमत दादा उढाण यांनी जलसंपदा विभागाकडे सातत्याने मागणी व पाठपुरावा केला होता.

चार आवर्तने मंजूर झाल्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी आणि उन्हाळी हंगामातील सिंचनाचे नियोजन करणे शक्य होणार आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे पिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, शेतीच्या पाणीप्रश्नाबाबत शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी चार आवर्तने मंजूर केल्याबद्दल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या वतीने आमदार हिकमत दादा उढाण यांनी आभार व्यक्त केले.

चारा-पाण्याअभावी जनावरांचे हाल

‘छावणीला नको, दावणीला चारा द्या’, किसान सभेची मागणी

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यात दुष्काळामुळे पशुधनासमोर भीषण चारा व पाणी टंचाई निर्माण झाली असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. या भयानक परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी अखिल भारतीय किसान सभा, परळी तालुका कमिटीच्या वतीने प्रशासनाला निवेदन देत विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

शासनाच्या दि २८ सप्टेंबरच्या अहवालानुसार जिल्ह्यात केवळ तीन आठवडे पुरेल इतकाच चारा शिल्लक होता, त्यामुळे नोव्हेंबर महिन्यात परिस्थिती अत्यंत भयावह झाली आहे. पावसात खंड पडल्याने शेती उद्ध्वस्त झाली असून शेतकऱ्यांना प्रचंड चढ्या भावाने चारा विकत घ्यावा लागत असल्याने त्यांची मोठी आर्थिक व शारीरिक ओढाताण होत आहे.

सध्या बाजारात जनावरे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आणली जात आहेत, मात्र खरेदीदार नसल्याने शेतकऱ्यांसमोर 'जनावरे विकायला गेले



तर विकत नाहीत आणि सांभाळावीत तर त्यांच्यासमोर खायला काय टाकावे?' असा गंभीर पेच निर्माण झाला आहे.या परिस्थितीवर मात करण्यासाठी किसान सभेने प्रशासनासमोर जिल्हा नियोजन आयोगाच्या निधीतून पशुधनासाठी चारा व पाणी उपलब्ध करून द्यावा आणि चाऱ्याच्या गुणवत्तेकडे काटेकोर लक्ष द्यावे, 'छावणीला नको, दावणीला द्या' या धोरणानुसार गावातच चारा पुरवठा व्हावा, जेणेकरून लहान शेतकऱ्यांना जनावरे घेऊन लांबच्या छावणीत जावे लागणार नाही, पशुधन विमा धोरण आखून पशु विम्याची बजेटमध्ये तरतूद करावी व पशुधनाचा विमा उतरावा, चाऱ्याची बचत होण्यासाठी 'मागेल त्याला कडबा कुट्टी' योजनेअंतर्गत रु. २० हजार पर्यंतचे अनुदान देण्यात यावे, रोजगार हमी योजनेमध्ये 'मागेल त्याला हायड्रोपोनिक्स' ही योजना समाविष्ट करावी. व्ही. जी. रामजी योजनेमध्ये पशुपालन व पशुखाद्य उगवणे यासाठी दोनशे दिवसांपेक्षा जास्त दिवसांचा रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शासनाने प्रति जनावर लागणारा चारा शेतकऱ्यांच्या दावणीला मोफत उपलब्ध करून देणे अत्यंत तातडीचे झाले असून, या मागण्यांवर त्वरित कार्यवाही न झाल्यास शेतकरी व पशुधन उद्ध्वस्त होईल, असा इशारा परळी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व दुध व पशुसंवर्धन अधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी किसान सभेचे राज्य सहसचिव कॉ.अजय बुरांडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.भगवान बडे, कॉ.विनायक राजमाने, धनंजय सोळंके, दूध उत्पादक शेतकरी ऋषिकेश भास्कर यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते.



वानटाकळी सरपंच गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांचे विरुद्ध अविश्वास दाखल

परळी /प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वानटाळी चे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांचे विरुद्ध ७ ग्रामपंचायत सदस्यांनी तहसीलदार परळी वैजनाथ यांचेकडे अर्ज दाखल केला असून तहसीलदार परळी वैजनाथ यांनी ग्रामपंचायत वानटाळी ची विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.असी माहिती ग्रामपंचायत सदस्य तुकाराम देविदास मुंडे यांनी दिली आहे.

वानटाकळी ग्रामपंचायतीचे सदस्य, यांनी सोमवार दि.०२/११/२०२६ रोजी श्री विनोद रनविरे ,तहसीलदार परळी वैजनाथ यांना नोटीस देऊन वानटाकळी चे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्या विरुद्ध ,सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर बेकायदेशीर मनमानी कारभार करत आहे., सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांची नियमित मासिकसभा घेत नाही., सरपंच, ग्रामपंचायत वानटाळी ची नियमित ग्रामसभा घेत नाही., सरपंच, ग्रामपंचायत सदस्यांना गाव विकासाच्या कामाचा व निधीचा हिशोब देत नाही., सरपंच, ग्रामपंचायत अंतर्गत नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व आरोग्य, स्वच्छतेची नागरी समस्या सोडविण्यासाठी पर्यत्न करत नाही.या व इतर कारणांमुळे सरपंच श्रीमती गंगाबाई ज्ञानोबा हांगे यांच्या विरुद्ध १)तुकाराम देविदास मुंडे २) अनिल शिवराम जाधव ३) सौ.हौसाबाई आत्माराम गायके ४) सौ.गंगा अनिल गायके ५) सौ.अर्चना उत्तम कसबे ६) प्रतिक्षा राजाभाऊ भाकरे ७)सौ कोमल भैय्यासाहेब घाडगे. यांनी अविश्वास ठराव दाखल केला आहे,त्यावर तहसीलदार परळी वैजनाथ यांनी दि.०५/११/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता ग्रामपंचायत कार्यालय वानटाळी येथे तहसीलदार परळी वैजनाथ यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.असी माहिती तुकाराम देविदास मुंडे यांनी दिली आहे.

माजी आमदार अमरसिंह पंडित आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

पैठण उजव्या कालव्याला ५ नोव्हेंबरपासून पाणी सुटणार



गेवराई (प्रतिनिधी) : जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, पहिली पाणीपाळी दि. ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या निर्णयामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, मतदारसंघातील शेतकरी व जनतेकडून आभार मानले जात आहेत.

जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा सल्लागार समितीची बैठक आज छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत पाणी नियोजनासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली, या बैठकीत रब्बी हंगामासाठी चार आणि उन्हाळी हंगामासाठी दोन आवर्तने देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने देण्याची मागणी मान्य करण्यात आली असून, पहिली पाणीपाळी ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

दुष्काळ व पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता गोदावरी नदीपात्रातील सर्व बॅरेज एप्रिल महिन्यात पाण्याने भरून देण्याची मागणी करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन बॅरेजमध्ये पाणी सोडण्यासही मान्यता देण्यात आली. सध्या जायकवाडी धरणात ७४ टक्के म्हणजेच सुमारे ५८ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, या पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने आणि पिण्याच्या पाण्यासाठी बॅरेजमध्ये पाणी सोडण्याचा निर्णय मार्गी लागला आहे. त्यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, नागरिकामधून समाधान व्यक्त होत असून, या निर्णयासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

१८ वर्षांचा गड कोसळला: सतीश चव्हाण यांच्या पराभवाचे वास्तव

– पुरुषोत्तम जाधव

मराठवाडा पदवीधर मतदारसंघात तीन टर्म आमदार राहिलेल्या सतीश चव्हाण यांचा पराभव राजकीय वर्तुळाला हादरवून गेला. मराठवाड्यातील ४४ आमदार, पाच मंत्री आणि खासदार-आमदारांची मोठी फौज पाठीशी असतानाही त्यांना पराभव पत्करावा लागला. अठरा वर्षे अभेद्य वाटणारा किल्ला एका निवडणुकीत कोसळला, याकडे अनेकांनी मोठा धक्का म्हणून पाहिले.

परंतु लोकमानसाचा विचार करता हा निकाल फारसा अनपेक्षित नाही.* राजकीय वर्तुळातील गणिते आणि सामान्य मतदाराच्या मनातील भावना यांत नेहमीच अंतर असते. नेत्यांची संख्या, यंत्रणेचा आकार आणि सत्तेचे पाठबळ यांवरून निवडणुकीचा अंदाज बांधला जातो. मात्र मतदार कोणता कौल देईल, हे त्याच्या स्वतःच्या अनुभवावर आणि मनात साचलेल्या नाराजीवर ठरते. *पदवीधर, तरुण आणि शिक्षक यांच्यात गेल्या काही वर्षांपासून वाढत असलेली खदखद वरवर शांत दिसत असली, तरी तिची तीव्रता मोठी होती. जे लोक जमिनीवर मतदारांशी सतत संवाद ठेवून होते, त्यांना या सुप्त लाटेची जाणीव आधीपासूनच होती.* त्यामुळे ज्यांनी लोकमानसाचा कानोसा घेतला, त्यांच्यासाठी हा निकाल धक्कादायक नव्हता, तर अपेक्षित परिणामाची केवळ औपचारिक पुष्टी होती.

मोठी यंत्रणा आणि मातब्बर नेत्यांचे पाठबळ अनेकदा लोकप्रतिनिधीला भ्रामक आत्मविश्वास देते.* समोर दिसणारी गर्दी आणि सहकाऱ्यांची आश्वासने म्हणजे जनतेचा खरा कौल नसतो. मतदार शांत राहतो, याचा अर्थ तो समाधानी आहे असा होत नाही. अनेकदा तो रोष बोलून दाखवत नाही, तर योग्य वेळी मतपेटीतून व्यक्त करतो. आमदार सतीश चव्हाण यांच्या बाबतीत नेमके तेच घडले.

या पराभवाचे पहिले कारण म्हणजे १८ वर्षांच्या सलग प्रतिनिधित्वामुळे तयार झालेली सत्ताविरोधी लाट. एकाच व्यक्तीकडे वर्षानुवर्षे सत्ता केंद्रित राहिली की मतदारांत थकवा येतो. विशेषतः तरुण पदवीधरांमध्ये बदलाची तीव्र इच्छा होती, आणि नव्या चेहऱ्याला संधी देण्याचा त्यांचा कौल निर्णायक ठरला. या इच्छेला तरुणाच्या प्रश्नांवरील नाराजीची धार होती. *राज्यभर चझडउ आणि नोकरभरतीसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले असताना, पदवीधरांचे प्रतिनिधी म्हणून चव्हाण यांनी हवी तशी आक्रमक भूमिका घेतली नाही, अशी भावना पदवीधरांमध्ये होती.* याचबरोबर नीट व इतर परीक्षेतील सातत्यपूर्ण पेपरफुटीमुळे तरुणांमध्ये व्यवस्थेबद्दल तीव्र संताप होता. लाखो विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे स्वप्न धुळीस मिळाल्याने सत्ताधारी वर्गाविषयी अविश्वास वाढला. पदवीधर मतदारसंघात तरुण आणि त्यांचे पालक हे निर्णायक घटक असल्याने हा रोष थेट मतपेटीत उमटला. चव्हाण हे सत्ताधारी महायुतीच्या बाजूने उभे असल्याने त्यांना या नाराजीचा फटका बसला, आणि त्यांनीही या प्रश्नावर ठोस भूमिका घेतली नाही. ज्यांच्यासाठी हा मतदारसंघ आहे, त्यांच्याच प्रश्नावर प्रतिनिधी गप्प राहिल्याने सुप्त रोष वाढत गेला आणि मतपेटीतून बाहेर पडला.

या वाढत्या नाराजीच्या वातावरणात पक्षफुटीचाही फटका बसला. पक्ष फुटण्यापूर्वी चव्हाण आणि डॉ. प्रतापसिंह पाटील एकाच पक्षात होते. दोघांच्याही शिक्षण संस्थांचे मोठे जाळे मराठवाड्यात पसरलेले आहे. पक्ष एक असताना या संस्थांची ताकद एकत्रितपणे चव्हाण यांच्या पाठीशी उभी राहत असे. यावेळी दोघे आमनेसामने आले आणि पाटील यांच्या संस्थांचे भक्कम जाळे चव्हाण यांच्याविरुद्ध उभे ठाकले. पदवीधर मतदारसंघात संस्था हेच मतांचे मुख्य वाहक असतात, त्यामुळे चव्हाण यांचा पायाच हलला.

ज्येष्ठ नेते शरद पवार साहेब यांची तरुण पिढीतील, विशेषतः ऋषाप न मधील क्रेझ, त्यांचा दांडगा राजकीय अंदाज, अनुभव आणि वेळप्रसंगी केलेल्या तडजोडी यांचा फायदा पाटील यांना झाला. दुसरीकडे, संभाजीनगर जिल्ह्यातील चव्हाण यांचे कट्टर प्रतिस्पर्धी यांनी योग्य डावपेच आखले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील चव्हाण यांचे इतरांशी असलेले वैमनस्यही त्यांच्याच विरोधात गेले. संस्थेतील अंतर्गत विसंवादामुळे बरेच लोक दुरावले आणि विरोधकांचे बळ वाढले.

महायुतीतील समन्वयाचा अभावही त्यांना भोवला, भाजप हा स्थानिक पातळीवर त्यांचा कट्टर विरोधक होता, पण महायुतीच्या राजकारणामुळे जुने वैमनस्य बाजूला ठेवून त्याला चव्हाण यांचा प्रचार करावा लागला. वरिष्ठांच्या आदेशाने युती झाली, तरी तळागाळातील कार्यकर्त्यांनी मनापासून साथ दिली नाही. कागदावरची युती जमिनीवर प्रभावी ठरली नाही, आणि परस्परांवरील अविश्वास चव्हाण यांच्याच अंगलट आला.

शिक्षकांची नाराजी हाही मोठा फटका ठरला

आमदार प्रशांत बंब अनेक दिवसांपासून शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याची मागणी करत आहेत आणि शिक्षकांविषयी टोकदार, बदनामीकारक भूमिका मांडत आहेत. त्यांच्या मतदारसंघात प्रशासनाच्या मदतीने शिक्षकांचा घरभाडे भत्ताही बंद करण्यात आला. शिक्षक हा पदवीधर मतदारसंघातील महत्त्वाचा घटक आहे. *अशा वेळी चव्हाण एक शब्दही बोलले नाहीत.* उलट पारंपरिक विरोधक आणि विधानसभा निवडणुकीतील प्रतिस्पर्धी असलेल्या बंब यांना सोबत घेऊन ते प्रचारात फिरले. दोघांना एकत्र पाहून मतदारांची नाराजी अधिकच उफाळून आली.

प्रचार यंत्रणेतील दोषही तितकेच गंभीर होते, स्थानिक पातळीवर सक्रिय असलेल्या सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांना बाजूला सारून सतीश चव्हाण यांनी स्वतःची यंत्रणा उभी केली. त्यात वर्षानुवर्षे जवळीक साधणारे, पण कसलाही जनसंपर्क नसलेले लोक होते, आणि काही जण मुकादमाप्रमाणे वावरत होते. नाराजांची नाराजी चव्हाण यांच्यापर्यंत पोहोचत होती की नाही, हे कळायला मार्ग नाही. काहींनी जाहीर नाराजी व्यक्त केल्यानंतरही त्यांनी संपर्क साधला नाही, उलट स्थानिक पातळीवरून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. लोक वरवर शांत राहिले, पण आतून सुप्त लाट तयार होत गेली.

आम्ही नोंदणी केली म्हणजे आम्हाला मतदान होईल असा भ्रम चव्हाण यांच्या यंत्रणेने बाळगला. पदवीधर मतदारसंघात नोंदणी केलेला मतदार प्रत्यक्ष मतदान करेलच याची खात्री नसते. नोंदणीनंतर त्याच्याशी संपर्क, संवाद आणि मतदानापर्यंतचा पाठपुरावा करावा लागतो. तो न झाल्याने कागदावरची मतसंख्या मतपेटीत उतरली नाही. कार्यकर्त्यांना न विचारता कर्मचाऱ्यांच्या हाताने यंत्रणा राबवणे त्यांच्या अंगलट आले.

या निवडणुकीचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असा की, मतदारांनी प्रताप पाटील कोण आहेत हे जाणून घेण्यापेक्षा सतीश चव्हाण नकोत हाच सूर धरला होता. म्हणजेच हा निकाल पर्यायाच्या बाजूने कमी आणि प्रस्थापिताच्या विरोधात जास्त होता.

थोडक्यात, हा पराभव एका रात्रीत घडलेला चमत्कार नाही, तर अनेक वर्षांत साचत गेलेल्या कारणांचा परिणाम आहे. सत्ताविरोधी लाट, तरुण व शिक्षकांच्या प्रश्नांवरील मौन, पक्षफुटीमुळे घटलेले संस्थात्मक बळ, कार्यकर्त्यांशी तुटलेला संवाद आणि जनाधार नसलेली यंत्रणा, या सर्वांची बेरीज म्हणजे हा निकाल. बाह्य कारणांपेक्षा अंतर्गत संवादहीनता आणि जमिनीवरील वास्तवाकडे केलेले दुर्लक्ष हेच मुख्य कारण ठरले.

लोकप्रतिनिधीसाठी यातून एकच धडा आहे की ,पदावर कितीही वर्षे असले तरी मतदारांचा विश्वास कायमचा गृहीत धरता येत नाही. मतदारांचे प्रश्न मांडण्यात आणि कार्यकर्त्यांशी संवाद ठेवण्यात खंड पडला, की मोठा गड़ही एका निवडणुकीत कोसळतो. लोकशाहीत शेवटी निर्णायक ठरतो तो सामान्य मतदार, आणि त्याच्या मनातील आवाज ऐकण्यात जो चुकतो, त्याला मोठ्या ताकदीनिशीही पराभवाला सामोरे जावे लागते.

– पुरुषोत्तम जाधव, माजलगाव.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६
TUESDAY, DT.03 NOVEMBER 2026
पान -८
PAGE - 8

वडवणीच्या दत्तात्रय टिपरे सरांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले!

मैत्रा फाउंडेशन, बीडचा दिमाखदार सोहळा; शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल

वडवणी ।प्रतिनिधी

बीड येथील मैत्रा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा २०२६' मध्ये वडवणी तालुक्यातील श्री. दत्तात्रय टिपरे सर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी बीड येथील शनी मंगल कार्यालयात हा दिमाखदार सोहळा उत्साहात पार पडला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास प्राचार्य डॉ. सविता शेटे, बीडच्या गटविकास अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त डॉ. कविता गीते, वडवणीचे गटशिक्षणाधिकारी श्री. राहुलजी भट्ट यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दत्ता वारे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड, उपाध्यक्ष संगीता आदमाने, योगेश सोळसे, सचिव उद्धव बडे, वडवणी तालुकाध्यक्ष बापू धनवे, श्री. सुनील भाऊ मुंडे, तसेच शिक्षक पतसंस्था वडवणीचे पी. एल. तिडके दादा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दत्तात्रय टिपरे सर



यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या सन्मानामुळे वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या सोहळ्यास कोठारबन शाळा, चिंचवण केंद्रातील शिक्षक बांधव-भगिनी, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतील अधिकारी, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दत्तात्रय टिपरे सरांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी दत्तात्रय टिपरे सर यांनी पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहून शुभेच्छा देणाऱ्या सर्व मान्यवरांचे, शिक्षक बांधवांचे, नातेवाईकांचे व मित्रपरिवाराचे मनःपूर्वक आभार मानले.वडवणी तालुक्यातून दत्तात्रय टिपरे सरांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



श्री.योगेश्वरी वधू-वर सूचक मंडळाचा १८ वा वर्धापन दिन व समाजभूषण पुरस्काराचे वितरण

येथील ब्राम्हण समाजाच्या वतीने गेल्या १८ वर्षांपासून काढण्यात येणाऱ्या वधू वर सूचक मंडळाच्या नवीन अंकाचे प्रकाशन व समाजभूषण पुरस्काराचे वितरण सोमवार २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्रीराम मंदिर, पाटील चौक,मंडी बाजार येथे झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून *श्री.नंदकिशोरजी मुंदडा*(नगराध्यक्ष,अंबाजोगाई)श्रीराम मंदिर येथील गदाधर बुआवधुवर अध्यक्ष प्रभाकरराव सेलमोकर यांच्या उपस्थितीत १८ वा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.या सोहळ्यातप्रा.सौ.रोहिणी पाठक (शैक्षणिक), श्री.उल्हास पांडे (सामाजिक),श्रीराम देशपांडे (आध्यात्मिक),सौ. राजश्री पिंपळे (सामाजिक) यांच्या कार्याचा गौरव समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सहा वर्षांपासून वेतन थकल्याने सफाई कर्मचाऱ्यावर उपासमारीची वेळ!

थकीत वेतनासाठी शेषराव शिंदे यांचे माजलगाव नगर परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू

माजलगाव : माजलगाव नगर परिषद अंतर्गत बडारनगर येथील सार्वजनिक शौचालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या शेषराव रामभाऊ शिंदे यांचे फेब्रुवारी २०२० पासून सप्टेंबर २०२६ पर्यंतचे वेतन अद्याप मिळाले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार निवेदने देऊनही वेतन मिळत नसल्याने अखेर त्यांनी सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ पासून माजलगाव नगर परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शेषराव शिंदे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ते बडारनगर येथील सार्वजनिक शौचालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. मात्र, फेब्रुवारी २०२० पासून सप्टेंबर २०२६ पर्यंतचे वेतन त्यांना अदा करण्यात आलेले नाही. यासंदर्भात त्यांनी यापूर्वी अनेक वेळा लेखी निवेदने देऊनही



त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आलेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वेतन मिळत नसल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून आर्थिक अडचणींमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचे शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे. थकीत वेतन अदा करून न्याय द्यावा, अन्यथा आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला होता.

या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार माजलगाव तसेच पोलीस निरीक्षक, माजलगाव पोलीस ठाणे यांना माहितीसाठी देण्यात आल्या आहेत.सहा वर्षांहून अधिक काळ काम करूनही वेतन मिळत नसल्याचा एका सफाई कामगाराचा आरोप अत्यंत गंभीर आहे. नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून थकीत वेतनाबाबत योग्य निर्णय घ्यावा आणि संबंधित कर्मचाऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

केज पंचायत समिती मधील५५९ घरकुलांची होणार सखोल चौकशी!

सुभाष सारुक यांच्या तक्रारीची दखल ; गटविकास अधिकाऱ्यांचे चौकशीचे आदेश

केज/प्रतिनिधी

केज पंचायत समिती अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील ५५९ घरकुलांच्या नोंदी आणि प्रत्यक्ष बांधकामांची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.जिवाचीवाडी येथील तक्रारदार सुभाष सखाराम सारुक यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत पंचायत समिती प्रशासनाने चौकशीचे निर्देश दिल्याने घरकुलांच्या नोंदी आणि अंमलबजावणी प्रक्रियेची पडताळणी होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत केज पंचायत समिती क्षेत्रातील ५५९ घरकुलांच्या नोंदी, लाभार्थ्यांची माहिती आणि प्रत्यक्ष बांधकामांच्या स्थितीची तपासणी



करण्यात यावी,अशी मागणी सुभाष सारुक यांनी निवेदनाद्वारे केली होती.संबंधित घरकुलांच्या नोंदींची सत्यता तपासण्या बरोबरच प्रत्यक्ष बांधकामांची सद्यस्थिती आणि लाभार्थ्यांना निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेचीही सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली होती.या प्रकरणात योग्य कार्यवाही न झाल्यास उपोषण करण्याचा इशाराही सारुक यांनी दिला होता.त्यांच्या निवेदनाची दखल घेत पंचायत समिती केजचे गटविकास अधिकारी वर्ग-१ विठ्ठल म. नागरगोजे यांनी चौकशीसाठी संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

लाभार्थ्यांची यादी आणि पुराव्यांची होणार तपासणी

चौकशी संदर्भातील आदेशानुसार,संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार दाराकडून ५५९ घरकुल लाभार्थ्यांची यादी प्राप्त करून घ्यावी.तसेच तक्रार दाराकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यांचा विचार करून निवेदनात उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांची सखोल चौकशी करावी,असे निर्देश देण्यात आले आहेत.यामध्ये घरकुलांच्या नोंदी, प्रत्यक्ष बांधकामांची स्थिती आणि निधी वितरण प्रक्रियेशी संबंधित बाबींची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे.चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश ही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

चौकशी अहवालाकडे लक्ष

या चौकशीमुळे केज पंचायत समितीअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील संबंधित ५५९ घरकुलांच्या नोंदी आणि प्रत्यक्ष कामकाजाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. आता संबंधित अधिकारी चौकशीत कोणत्या बाबींची पडताळणी करतात आणि त्यातून काय निष्पन्न होते,याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.दरम्यान,चौकशीचे आदेश देण्यात आले असले तरी या प्रकरणा तील कोणत्याही अनियमिततेला अद्याप अधिकृत चौकशीतून दुजोरा मिळालेला नाही.चौकशी अहवाला नंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

जलजीवन मिशनची चार वर्षांपासून रखडलेली सातेफळची पाणीपुरवठा योजना सुरू करा

केज/प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन अंतर्गत केज तालुक्यातील सातेफळ येथील पाणीपुरवठा योजना गेल्या चार वर्षांपासून रखडलेली आहे.ही योजना तात्काळ पूर्ण करून गावातील नागरिकांना नियमित पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून द्यावी,या प्रमुख मागणी साठी हनुमंत बळीराम घाडगे सर यांनी असंख्य ग्रामस्थां सह केज पंचायत समिती कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घराला नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. मात्र,सातेफळ गावातील योजना चार वर्षांपासून रखडल्याने शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. एकीकडे योजनेच्या नावाखाली निधी खर्च होत असल्याचे सांगितले जाते,तर दुसरीकडे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेष म्हणजे,केवळ सातेफळच नव्हे तर केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात पाणी पुरवठ्याचा प्रश्न



गंभीर बनलेला आहे.काही ठिकाणी पाइपलाइन, पाण्याच्या टाक्या आणि नळजोडण्यांची कामे झालेली असताना ही नागरिकांना नियमित पाणी मिळत नसल्याने या योजनांच्या कार्य क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जलजीवनच्या कामांची गुणवत्ता तपासणार कोण?

केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत झालेली कामे निकृष्ट दर्जाची किंवा नियमबाह्य असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून केल्या जात आहेत.त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची शासनाच्या क्वालिटी कंट्रोल विभागामार्फत अथवा सक्षम तांत्रिक यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी,अशी मागणी जनतेतून होत आहे.

प्रत्येक गावातील मंजूर निधी,प्रत्यक्ष खर्च, कामांची गुणवत्ता, पाइपलाइनची स्थिती, पाण्याच्या टाक्यांची क्षमता आणि प्रत्यक्ष सुरू असलेला पाणी पुरवठा यांची तपासणी करावी.तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी,कंत्राटदार आणि जबाबदार यंत्रणांवर नियमानुसार कारवाई करावी,अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

चार वर्षे उलटली, तरी सातेफळकरांना पाणी कधी?

शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या योजनेचा लाभ प्रत्यक्ष गावकऱ्यां पर्यंत पोहोचत नसेल, तर अशा योजनांच्या अंमलबजावणीचा उपयोग काय? चार वर्षांपासून रखडलेली सातेफळची पाणी पुरवठा योजना तातडीने सुरू करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा,ही उपोषण कर्त्यांची प्रमुख मागणी आहे.

आता पंचायत समिती आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी या आमरण उपोषणाची दखल घेऊन सातेफळच्या पाणीप्रश्नावर ठोस निर्णय घेतात का,तसेच केज तालुक्यातील जलजीवन मिशनच्या कामांची गुणवत्ता तपासणी करतात का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळग्रस्त मच्छिमार कुटुंबांना ५० हजारांची मदत द्या!

अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेचे अंकुश बलया यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

माजलगाव ।प्रतिनिधी

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या मच्छिमार कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मच्छिमार विभागाचे प्रतिनिधी अंकुश बलया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

२०२५ मध्ये पावसाची अतिवृष्टी झाल्याने नाशिकपासून गोदावरी नदीच्या परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती. मात्र, या परिस्थितीचा कहार, कहार भोई, झिंगा भोई, परदेशी भोई, फुटाणे भोई, भिल्ल मल्हार भोई, ढीबर केवट या स्थानिक मच्छिमारांना अपेक्षित लाभ मिळाला नाही. शासनाच्या विविध योजनांपासून मच्छिमार वंचित असल्याचे निवेदनात म्हटले आहे. मच्छिमार सहकारी संस्थांना कर्ज उपलब्ध करून देण्याच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने मच्छिमार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. बँकांकडून कर्ज मिळण्यातही अडचणी येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मच्छिमारांना मासेमारीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करता यावे, यासाठी शासनाने कर्ज उपलब्ध करून द्यावे. तसेच मच्छिमार संस्थांच्या माध्यमातून कर्ज वितरणाची प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मच्छिमारांना प्रधानमंत्री योजनांमधून मदत मिळावी, त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडवावा आणि संकटग्रस्त कुटुंबांना तातडीने आर्थिक आधार द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

स्थानिक मच्छिमारांना त्यांच्या जातीचे



प्रमाणपत्र, आधार कार्ड व पॅन कार्ड यांच्या आधारे योजनांचा लाभ मिळवून द्यावा. गोदावरी नदीच्या परिसरातील मच्छिमारांना गाळपेरा जमिनी उपलब्ध करून देण्याबाबतही शासनाने विचार करावा, अशी मागणी मुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री, उपमुख्यमंत्री तसेच बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे श्री. बलया यांनी केली आहे.

वैद्यनाथ शिक्षण संस्थेच्या प्रशासकपदी उपशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांची नियुक्ती

वैद्यनाथ शिक्षण संस्थेच्या शाळेवर प्रशासक नियुक्त; शासनाची मान्यता

परळी प्रतिनिधी. शहरातील बहुचर्चित व जुन्या शाळा पैकी एक असलेल्या वैद्यनाथ शिक्षण संस्था संचालित वैद्यनाथ विद्यालय प्राथमिक व माध्यमिक या शाळेच्या व्यवस्थापनाच्या प्रशासकपदी बीड जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांची शासनाने नियुक्ती केली आहे. त्यामुळे वैद्यनाथ विद्यालयाच्या विद्यार्थी व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील काही वर्षांपासून वैद्यनाथ शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन मंडळामध्ये कोणीही अधिकृतरित्या मान्यताप्राप्त नसल्यामुळे वैद्यनाथ विद्यालय प्राथमिक व माध्यमिक या शाळेमधील शिक्षकांचा प्रश्न गाजत होता. त्यामुळे शाळेच्या विद्यार्थी संख्येवरही परिणाम झाला होता. परंतु आता शासनाच्या शालेय शिक्षण



विभागाने व वैद्यनाथ विद्यालयाचे कामकाज सुरळीत चालावे व विद्यार्थी आणि शिक्षकांच्या समस्या सुटाव्यात यासाठी बीड जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षण विभागाचे उप शिक्षणाधिकारी धनंजय शिंदे यांचे नुकतीच प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्याबरोबर इतर तिघा जणांचा समितीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

या समितीत परळी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती हिना अन्सारी,सुवर्णाकार मधुकर अंबाजोगाई आणि नामदेव मुंडे परळी यांचा समावेश आहे. दरम्यान प्रशासन पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात धनंजय शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना धनंजय शिंदे म्हणाले की विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे हित साधण्यासाठी प्राधान्याने लक्ष देऊन.

लोकशाहीच्या रक्षणा साठी काँग्रेसच्या नेत्या

रजनीताई पाटील आक्रमक,दिल्ली मैदानावर मतचोरी विरोधात काँग्रेसचा एल्गार

केज/प्रतिनिधी

मतदारांच्या हक्कांचे संरक्षण,निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी हिमाचल प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी तथा माजी खासदार रजनीताई अशोकराव पाटील यांनी आयोजित सभेत सहभागी होत मतदारांच्या प्रश्नांवर आवाज बुलंद केला.

मतदार याद्यांमधील कथित अनियमितता, मतचोरीचे आरोप आणि एसआयआर (डखठ) प्रक्रियेतील आक्षेप या मुद्द्यांवरून निवडणूक आयोगाला जाब विचारण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रजनीताई पाटील यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करत मतदारांच्या घटनात्मक अधिकारांबाबत काँग्रेसची भूमिका मांडली.या सभेला हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्री,राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्री,काँग्रेसचे वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेमध्ये मतदार याद्यांमधील कथित त्रुटी,पात्र



मतदारांच्या नावांचा समावेश, मतदानाच्या अधिकारांचे संरक्षण आणि निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच काँग्रेसच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाला निर्भयपणे मतदान करता आले पाहिजे.मतदार याद्या अचूक व पारदर्शक असणे ही निवडणूक प्रक्रियेची मूलभूत गरज आहे.मतदारांचा मतदानाचा अधिकार अबाधित राहावा आणि निवडणूक आयोगावरील जनतेचा विश्वास कायम राहावा, अशी भूमिका यावेळी काँग्रेस नेत्यांनी मांडली

मतचोरीच्या आरोपां वरूनही सभेत केंद्रस्थानी चर्चा झाली. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांचे अधिकार, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि घटनात्मक संस्थांची विश्वासार्हता या मुद्द्यांवर काँग्रेसच्या नेत्यांनी जोरदार भूमिका मांडली.या सभेतील रजनीताई पाटील यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली.